# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १४६ वा ❑ भारतीय सौर दिनांक ३० आषाढ शके १९४८, मंगळवार दि.२१ जुलै २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### कठोर परिश्रमाचे फळ: श्रावणी कुदळेचे नीट यूजी मध्ये दैदिप्यमान यश

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रम जर प्रामाणिक असतील, तर यशाचे शिखर कितीही उंच असले तरी ते सर करता येते, हे पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील एका छोट्याशा खडकी गावातील श्रावणी कुदळे हिने प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या अत्यंत आव्हानात्मक अशा नीट यूजी २०२६ वैद्यकीय प्रवेश परीक्षेत श्रावणीने ७२० पैकी तब्बल ७१० गुण मिळवून देशाच्या शैक्षणिक नकाशावर आपल्या गावाचे नाव सुवर्णअक्षरांनी कोरले आहे.

या अभूतपूर्व यशामुळे श्रावणी देशभरातील मुलींमध्ये प्रथम आली असून, अखिल भारतीय पातळीवर एअर तिने पाचवा क्रमांक पटकावला आहे. एका छोट्याशा ग्रामीण पार्श्वभूमीतून येत, कोणतीही मोठी महानगरीय संसाधने नसताना तिने मिळवलेले हे यश आज देशातील लाखो आणि कोट्यवधी विद्यार्थ्यांसाठी एक जिवंत प्रेरणास्रोत ठरले आहे.

श्रावणीचे हे यश एका रात्रीत मिळालेले नाही, तर त्यामागे वर्षानुवर्षांची तपश्चर्या आहे. प्राथमिक शिक्षणाचा पाया जिल्हा परिषदेच्या शाळेत घातला होता. श्रावणीचे आई आणि वडील दोघेही पेशाने शिक्षक आहेत. घरात सुरुवातीपासूनच शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देणारे आणि संस्कारक्षम वातावरण होते. आई–वडिलांच्या आदर्शामुळे श्रावणीला लहानपणापासूनच पुस्तकांची आणि अभ्यासाची गोडी लागली. विशेष कौतुकाची गोष्ट म्हणजे, श्रावणीचे प्राथमिक शिक्षण हे जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. अनेकदा सरकारी किंवा ग्रामीण शाळांबद्दल असणारे पूर्वग्रह बाजूला सारत, जिल्हा परिषदेच्या शाळेतून मिळालेला शिक्षणाचा पाया किती मजबूत असू शकतो, हेच श्रावणीच्या या यशाने अधोरेखित केले आहे. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर, तिने वैद्यकीय क्षेत्रात जाण्याचे आपले ध्येय निश्चित केले आणि त्या दृष्टीने अतिशय नियोजनबद्ध पावले टाकण्यास सुरुवात केली.

डिजिटल युगात आदर्श त्याग म्हणजे तिने दोन वर्षे मोबाईलला पूर्ण नो एन्ट्री करून टाकले होते. आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात जिथे लहान मुलांपासून ते तरुणांपर्यंत प्रत्येक जण मोबाईल आणि सोशल मीडियाच्या जाळ्यात अडकला आहे, तिथे श्रावणीने दाखवलेला संयम थक्क करणारा आहे. नीट परीक्षेची तयारी करत असताना गेली दोन वर्षे श्रावणीने मोबाईलला स्पर्शही केला नाही.

फेसबुक, इंस्टाग्राम, व्हॉट्सअॅप यांसारख्या सोशल मीडियाच्या आभासी दुनियेपासून आणि मनोरंजनाच्या साधनांपासून तिने स्वतःला पूर्णपणे दूर ठेवले. आजच्या काळातील विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित होण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे मोबाईल, हे ओळखून तिने घेतलेला हा निर्णय तिच्या यशात मैलाचा दगड ठरला.

मोबाईल आणि सोशल मीडियापासून दूर राहिल्यामुळे माझा बराच वेळ वाचला आणि मुख्य म्हणजे मला अभ्यासावर शंभर टक्के लक्ष केंद्रित करता आले. वेळेचा योग्य विनियोग, अभ्यासातील सातत्य आणि स्वतःच्या मनावर असलेले नियंत्रण यामुळेच आज मी या टप्प्यापर्यंत पोहोचू शकले, अशा शब्दांत श्रावणीने आपल्या यशाचे गमक सांगितले.

केवळ घोकंपट्टी नाही, तर अभ्यासाचे स्मार्ट आणि सखोल नियोजन

श्रावणीचा दिनक्रम आणि अभ्यासाची पद्धत ही इतर विद्यार्थ्यांपेक्षा वेगळी होती. ती केवळ पुस्तके समोर घेऊन तासन् तास बसून राहणाऱ्यांपैकी नव्हती. तिच्या अभ्यासाची पद्धत तिला यशाकडे घेऊन गेली. तिने प्रत्येक दिवसाचे, प्रत्येक तासाचे काटेकोर वेळापत्रक तसेच सूक्ष्म वेळापत्रक तयार केले होते आणि त्याचे ती तंतोतंत पालन करत असे. नियमित सराव परीक्षा देत असे. अभ्यास पूर्ण झाल्यानंतर ती रोज नियमितपणे प्रश्नपत्रिका सोडवत असे. वेळेचे नियोजन कसे करावे, याचा सराव तिने यातून केला. चुकांचे आत्मपरीक्षण करणे हे अग्रक्रमाने तिने केले. परीक्षा दिल्यानंतर आपल्या कोणत्या विषयात आणि कोणत्या प्रश्नात चुका होत आहेत, याचे ती बारीक निरीक्षण करायची. त्या चुका पुन्हा होणार नाहीत, याची काळजी घेत तिने कठीण संकल्पनांवर विजय मिळवला. संयम आणि सातत्य यावर भर देऊन भौतिकशास्त्र किंवा रसायनशास्त्र यांमधील काही कठीण वाटणारे धडे तिने कंटाळा न करता, अत्यंत संयमाने आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाने वारंवार अभ्यासून आत्मसात केले.

श्रावणीच्या आई–वडिलांचे मार्गदर्शन आणि कौटुंबिक पाठबळ या यशामध्ये महत्वाची भूमिका बजावली आहे.

श्रावणीच्या या यशात तिच्या शिक्षक पालकांचा वाटा अत्यंत महत्त्वाचा आहे. एका बाजूला शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांचे मानसशास्त्र ठाऊक असणे आणि दुसऱ्या बाजूला आपल्या मुलीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे, ही दुहेरी भूमिका तिच्या पालकांनी चोख बजावली. तिची जिद्द कमी होणार नाही आणि अभ्यासाचा ताण तिच्यावर येणार नाही, याची काळजी घेत त्यांनी श्रावणीला नेहमीच प्रोत्साहित केले. योग्य वेळी मिळालेले पालकांचे मार्गदर्शन आणि विश्वासाचे वातावरण यामुळेच श्रावणी अंतिम परीक्षेत आत्मविश्वासाने सामोरी गेली आणि तिने हे उत्तुंग यश मिळवले.

लाखो विद्यार्थ्यांसाठी नवा रोल मॉडेल:

आजच्या स्पर्धात्मक युगात नीट सारख्या कठीण परीक्षेत यश मिळवणे हे अनेकांचे स्वप्न असते. अशा वेळी ग्रामीण भागातील श्रावणी कुदळेची ही यशोगाथा प्रत्येक विद्यार्थ्याला एक नवा मार्ग दाखवते. मोठे स्वप्न पाहा, ते पूर्ण करण्यासाठी कठोर आणि शिस्तबद्ध मेहनत करा, सोशल मीडियाच्या आकर्षणा बळी पडू नका आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवा, हाच संदेश श्रावणीने आपल्या कार्यातून दिला आहे. कोणत्याही मोठ्या शहरात न जाता, महागड्या सुखसोयींशिवाय केवळ स्वतःचे कष्ट आणि पालकांच्या सोबतीने कोणतेही ध्येय अशक्य नसते, हे श्रावणीने सिद्ध केले आहे. तिच्या या ऐतिहासिक आणि देदीप्यमान यशाबद्दल खडकी गावातील ग्रामस्थांनी जल्लोष केला असून, संपूर्ण पुणे जिल्ह्यातून, तसेच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आणि राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडून तिच्यावर कौतुकाचा आणि अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## संगीत रचनांतील वैविध्य हे शंकर–जयकिशन यांचे वैशिष्ट्य–स्वप्निल पोरे

ज्योतिर्मय साहित्य

पुणे : संगीत रचनांमधील वैविध्यामुळे शंकर– जयकशिन यांनी श्रोत्यांच्या अनेक पिढ्यांवर अधिराज्य गाजवले, असे मत चित्रपट अभ्यासक व लेखक स्वप्निल पोरे यांनी व्यक्त केले.

साताऱ्यातील दीपलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था आणि विजय साबळे यांच्या वतीने पुण्यातील अक्षरवेल सभागृहात गोल्डन हिट्स ऑफ शंकर जयकिशन हा गाण्यांचा कार्यक्रम नुकताच झाला. यावेळी ते बोलत होते. साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस, कुपर इंडस्ट्रीजच्या मनुष्यबळ विभागाचे प्रमुख नितीन देशपांडे, स्तंभलेखक व दीपलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक – अध्यक्ष शिरीष चिटणीस, कवयित्री मृणाल जैन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे प्रमुख डॉ. संदीप सांगळे,




अमरेंद्र भास्कर मराठी बालकुमार साहित्य संस्थेचे कार्यवाह डॉ. दिलीप गरुड यावेळी उपस्थित होते.

डॉ. सुनील पटवर्धन, सचिन शेरकर, विजय साबळे, मंजुषा पोतनीस, स्मिता शेरकर यांनी यावेळी शंकर जयकिशन यांनी स्वरबद्ध केलेली अनेक लोकप्रिय गीते सादर केली.

साताऱ्यातील या सर्व कलाकारांना उपस्थितांची भरभरुन दाद मिळाली. डॉ. सबनीस, नितीन देशपांडे यांच्या हस्ते कलाकारांचा सत्कार करण्यात आला.

नौशाद, अनिल विश्वास, सी. रामचंद्र, खेमचंद प्रकाश असे एकाहून एक दिग्गज संगीतकार असताना शंकर जयकिशन यांनी केवळ स्वतंत्र स्थान नव्हे तर युग निर्माण केले, असे पोरे यांनी सांगितले. ते म्हणाले, चित्रपटातील प्रत्येक गीत लोकप्रिय करण्याची किमया त्यांना साधली होती. शंकर जयकिशन यांचे संगीत म्हणजे चित्रपटाच्या यशाची हमी, हे समीकरण बनले. एवढेच नव्हे तर मनोजकुमार, राजेंद्रकुमार यांच्यासह अनेक कलाकारांच्या यशामध्ये त्यांच्या संगीताचा वाटा महत्त्वाचा राहिला. संगीताची निष्ठेने साधना करणारे शंकरजी अतिशय भक्तीभावाने आषाढी वारीत सहभागी होत असत.

संगीतकार शंकर – जयकिशन, त्यांच्या रचना अमर करणाऱ्या लतादीदी, रफी, मुकेश, त्या पिढीतील अन्य कलाकार काळाच्या पडद्याआड गेले, मात्र माधुर्याने ओथंबलेली त्यांची गीते नव्या पिढीसमोर सतत आणून या गीतांना संजीवनी देण्याचे कार्य विजय साबळे आणि त्यांचे सहकारी करत आहेत, असे डॉ. सबनीस यांनी नमूद केले. ते म्हणाले, आजच्या काळात अर्थहीन शब्द असलेल्या गाण्यांचा धुमाकूळ असताना त्यावेळच्या शैलेंद्र, हसरत जयपुरी यांच्यासारख्या प्रतिभाशाली गीतकारांची प्रकर्षाने आठवण होते. आजच्या समाजात ताणतणाव आहे, जीवन चिंतेने ग्रासले आहे. या पार्श्वभीमीवर सुवर्णकाळातील गीते मनाला चैतन्य देणारी आहेत. सातारची नाळ पुण्याला जोडणारा हा उपक्रम शिरीष चिटणीस यांच्या पुढाकाराने होत असून तो स्वागतार्ह आहे, असे देशपांडे यांनी सांगितले. जुनी गाणी शांततेची अनुभूती देतात, असे ते म्हणाले. दीपाली गीते यांनी सूत्रसंचालन केले.

पंछी बनी उडती फिरु मस्त गगन में, एहसान तेरा होगा मुझपर, ये मेरा दिवानापन हैं, जाओ रे जोगी तुम जाओ रे यांसह असंख्य गाणी सादर करून शंकर–जयकिशन यांना सांगितिक आदरांजली वाहण्यात आली.

## कर्मयोग : दशमेशापलीकडील यशाचे तत्त्वज्ञान (भाग १)

ज्योतिर्मय साहित्य

दशमेश म्हणजे काय?

''दशमेश'' हा शब्द उच्चारताच अनेकांच्या मनात दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याचे चित्र उभे राहते. त्या वयात पालकांच्या मनात एकच प्रश्न सतत घोळत असतो, 'माझ्या मुलाचे किंवा मुलीचे भविष्य कसे असेल? त्याची कारकीर्द, व्यवसाय किंवा जीवनक्रम (करियर) कोणत्या दिशेने जाईल?' या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी कलचाचणी (अप्टीट्युड टेस्ट), मानसशास्त्रीय मूल्यमापन, समुपदेशन (कौन्सिलिंग) अशा विविध उपायांचा आधार घेतला जातो. परंतु भारतीय ज्योतिषशास्त्रात या प्रश्नाशी संबंधित आणखी एक महत्त्वाची संकल्पना आहे 'दशमेश'.

'दशमेश' म्हणजे जन्मकुंडलीतील दहाव्या स्थानाचा अधिपती किंवा स्वामी. ज्योतिषशास्त्राशी परिचित नसलेल्या वाचकांसाठी या संकल्पनेचा थोडक्यात परिचय आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्तीच्या जन्मवेळेची, जन्मस्थळाची आणि जन्मतारखेची माहिती उपलब्ध असल्यास त्याची जन्मकुंडली तयार करता येते. व्यक्ती भारतातील असो, जपान, चीन, अमेरिका, कोस्टारिका, चिली, नेपाळ, भूतान किंवा जगातील कोणत्याही देशातील असो, ग्रहांची गणना करण्याची पद्धत सर्वत्र एकच असते. जन्मकुंडली म्हणजे त्या व्यक्तीच्या जन्मक्षणी जन्मस्थळावरून दिसणाऱ्या ग्रह–ताऱ्यांच्या आकाशातील स्थितीचे वैज्ञानिक गणिती चित्रण होय. स्काय मयाप ऑफ प्ल्यानेटस याट पर्टीक्युलर को आँर्डीनेटस, उदाहरणार्थ, छत्रपती संभाजीनगरचे भौगोलिक स्थान सुमारे १९.८९९० उत्तर अक्षांश आणि ७५.३१९५ पूर्व रेखांश असे आहे. पृथ्वीच्या ३६० अंशांच्या परिघाच्या आधारे ग्रहांची त्या क्षणाची स्थिती निश्चित केली जाते. त्यानंतर कुंडलीतील बारा भावांमध्ये राशींची मांडणी केली




जाते. पहिल्या भावात मेष, दुसऱ्यात वृषभ, तिसऱ्यात मिथुन... अशा क्रमाने बाराव्या भावापर्यंत मीन राशी येते.

या बारा भावांपैकी दहाव्या भावात जी रास येते, त्या राशीचा स्वामी म्हणजे त्या व्यक्तीचा दशमेश. ज्योतिषशास्त्रानुसार, हा दशमेश व्यक्तीच्या कर्म, व्यवसाय, सामाजिक प्रतिष्ठा, सार्वजनिक जीवन, नेतृत्वक्षमता आणि कर्तृत्व यांचे प्रतिनिधित्व करतो, मात्र येथे एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. दशमेश गुरु, मंगळ, शनी किंवा रवि यांसारखा सामर्थ्यवान ग्रह आहे, म्हणून सर्व काही सहज आणि आपोआप घडून येईल, असे अजिबात नाही. जीवनात ''दे रे हरी खाटेवरी'' असा नियम कधीच लागू होत नाही. जर तसे असते, तर भगवान श्रीकृष्णांना अर्जुनाला 'कर्मयोगाचा' (अध्याय३) उपदेश करण्यासाठी श्रीमद्भगवद्गीतेसारखा महान ग्रंथ प्रतिपादन करण्याची आवश्यकताच भासली नसती.

माझ्या मते, दशमस्थानात शुभ ग्रह असणे किंवा त्या स्थानावर शुभ ग्रहांची दृष्टी असणे हे निश्चितच सहाय्यभूत ठरते; परंतु ते यशाची हमी देत नाही. ग्रह अनुकूल असणे ही एक प्रकारची क्षमता किंवा संधी असते; त्या क्षमतेचे यशात रूपांतर करण्यासाठी पुरुषार्थ, परिश्रम आणि योग्य कर्म आवश्यक आहे. जर केवळ बलवान दशमेशामुळेच सर्व काही सहज घडत असते, तर मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम आणि योगेश्वर श्रीकृष्ण यांच्या जीवनात संघर्ष, संकटे आणि कठोर परीक्षा आल्या नसत्या. त्यांच्या जीवनात वनवास, अन्याय, युद्ध, कर्तव्यपालन आणि लोककल्याणासाठी अखंड प्रयत्न यांचे दर्शनच घडले नसते, परंतु प्रत्यक्ष इतिहास आणि धर्मग्रंथ याउलट चित्र आपल्या समोर ठेवतात.


यावरून स्पष्ट होते की, ग्रहस्थिती ही माणसाला दिशा देऊ शकते; परंतु त्या दिशेने चालण्याचे कार्य त्यालाच करावे लागते. अनुकूल ग्रह व्यक्तीला संधी उपलब्ध करून देतात; परंतु त्या संधीचे सुवर्णसंधीत रूपांतर करण्यासाठी कर्माशिवाय पर्याय नसतो. याच संदर्भात आता आपण प्रभू श्रीराम आणि भगवान श्रीकृष्ण यांच्या जन्मकुंडलीकडे दृष्टिक्षेप टाकू. त्या दोघांनाही श्रद्धापूर्वक वंदन करून त्यांच्या कुंडलीतील दशमस्थान, दशमेश आणि कर्मयोग यांचा परस्परसंबंध समजून घेण्याचा प्रयत्न करूया. त्यांच्या कुंडल्या जितक्या विलक्षण आहेत, तितकाच त्यांच्याकडून मिळणारा कर्मयोगाचा संदेशही चिरंतन आणि प्रेरणादायी आहे.

**क्रमश: भाग २ – श्रीराम, श्रीकृष्ण आणि कर्मयोग**









## जात्यावरच्या ओव्या......

पंढरीचा पांडुरंग
ठेवी कटेवर हात
दिंडी चा सोहळा
कसा पाहतो हसत ||७५२||

पंढरीचा पांडुरंग
लावी चंदनाचा टिळा
भजनात तल्लीन
वारकरी साधाभोळा ||७५३||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ५४

ज्योतिर्मय साहित्य

**सदा सेवि आरण्य तारुण्यकाळी ।**
**मिळेना कदा कल्पनेचेनि मेळी ।**
**चळेना मनी निश्चयो दृढ ज्याचा ।**
**जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।५४।**


अर्थ : जो भक्त तरुणपणी एकांतात राहून आपला काळ घालवतो, कल्पनेच्या राज्यात जो रमत नाही, ज्याची भगवंतावरील श्रद्धा अढळ असते, असा भक्त खरोखरच त्या सर्वोत्तम असलेल्या भगवंताचा जगामध्ये धन्य असलेला दास आहे.

( सेवि - काळ घालवणे, आरण्य - एकांतवास, मिळेना - मिसळत नाही, मेळी - समूह, चळणे - परावृत्त होणे )



विवेचन : ज्या व्यक्तीला भगवंताची ओढ लागलेली अशी व्यक्ती तरुणपणातच एकांतात राहून त्याचे ध्यान किंवा नामस्मरण करणे पसंत करते. इथे समर्थांनी अरण्य हा शब्द जरी वापरलेला असला तरी प्रत्यक्षात अरण्यातच जाऊन राहिले पाहिजे असा त्याचा अर्थ नाही तर भगवंत प्राप्तीसाठी एकांतात जाऊन तपश्चर्या करणे आवश्यक आहे हा त्याचा अर्थ घेता येतो. आजच्या काळात ही गोष्ट थोडीशी विचित्र वाटेल. तरुणपणातच कसे काय एकांतात राहायचे आणि भगवंताचे ध्यान करायचे? ती तर म्हातारपणी करण्याची गोष्ट आहे अशी आपली समजूत असते. पण साधना ही पुढे ढकलण्याची गोष्ट नव्हे तर तरुणपणीच करण्याची गोष्ट आहे.

एकांताची सवय होण्यासाठी घरातील एखादा निवांत कोपरा किंवा जवळचे एखादे शांत मंदिर अशा ठिकाणी जाऊन स्वसंवाद करता येईल. काही काळ टीव्ही, मोबाईल यासारख्या गोष्टींपासूनही दूर राहण्याची सवय करावी लागेल.




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

पण समर्थ या अनुभवातून गेले आहेत. ''आधी केले मग सांगितले'' असेच त्यांचे बोल आहेत. अगदी तरुणपणी त्यांनी नाशिक जवळील टाकळी येथे राहून बारा वर्षांचा काळ एकांतात घालवला. ज्ञानेश्वरादी भावंडांनी एकांतात राहूनच तपश्चर्या केली. संत तुकाराम महाराज भंडारा डोंगरावर एकांतात आपला काळ घालवित असत.

तरुण वयात उत्साह असतो, काहीतरी करण्याची जिद्द असते अशावेळी एकांताचे सेवन सहज होऊ शकते. जेव्हा सगळी गात्रे थकलेली असतात अशावेळी एकांतात राहणे मनुष्याला शक्य होत नाही. वृद्धापकाळी मुलांशी पटत नाही म्हणून जंगलात जाऊन राहणे हे लादलेले वैराग्य म्हणता येईल. तीर्थयात्रा, निरनिराळ्या ग्रंथांचा अभ्यास, भजन, प्रवचन, कीर्तन इत्यादी गोष्टी तरुणपणीच उत्तमरीत्या करता येतात. मुखात रामाचे नाव तरुणपणीच यायला हवे. आयुष्यभर जर जिभेवर राम नाही आला तर अंतिम समयी तरी तो कसा येईल? त्यावेळीही कामच आठवेल. **(क्रमशः)**



ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏

## || संजय उवाच... ||

@संजय काव्या पुणे 7743918559




✍ सेवा

सेवा ही एक प्रकारे मदतच असते, सेवा ही अनमोल असते, सेवेचे फळ वेगवेगळ्या स्वरूपात मिळत असते पण यातील भाव निस्वार्थी असावेत. सेवेतून सर्व साध्य करता येते. सेवा मेवा मिळावी म्हणून करू नये.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

## सद्गुरूची कामगिरी



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

सद्गुरूची कामगिरी कोणती ? आरशावर धूळ पडलेली असते, ती बाजूला सारायला सद्गुरू सांगतात; आपले चुकते कुठे ते सद्गुरू सांगतात. सद्गुरू आपल्याला मार्गाला लावतात. स्वप्नामध्ये तलावात पडला म्हणून ओरडू लागला, तोच जागा झाल्यावर ओरडायचा थांबला ! सद्गुरू जागे करण्याचे काम करतात. मला करायचेच काही उरले नाही असे ज्याने म्हटले, त्याने सद्गुरू खरोखर केला असे म्हणावे. एखादा सुखवस्तू गृहस्थ मी स्वस्थ आहे असे म्हणतो, पण ते काही खरे नाही. मन जोवर गिरक्या मारते तो पर्यंत तो स्वस्थ आहे असे नाही म्हणता येणार.

शिष्याच्या भावनाच गुरूला गुरुपद देतात. जो शरण जातो त्याचा कार्यभार सद्गुरू उचलतो. ज्याची दृष्टी रामरूप झाली तो खरा गुरू. जे चिरकाल टिकते ते गुरुपद समजावे. खरोखर, सद्गुरु म्हणजे मूर्तिमंत नामच होय. गुरूने सांगितलेले अक्षरशः पाळणे हेच खरे साधन. संत कुणालाही देहाने कायमचे लाभले नाहीत. संतांना भगवंताचा जो ध्यास असतो तो महत्त्वाचा आहे. पुष्कळांना संतांची गाठ पडते, परंतु सत्संगतीचे महत्त्व न कळल्यामुळे बहुतेकांना त्यापासून जो व्हायला पाहिजे तो फायदा होत नाही. आपली जी कर्तव्ये ठरली आहेत ती आपण बरोबर करावीत. व्यापार थोडक्या प्रमाणात केला तर पुढे वाढतो, त्याप्रमाणे कर्तव्य करीत गेल्याने फळाची आशा आपोआपच सुटेल. आपले कर्तव्य कोणते ते सद्गुरू आपल्याला दाखवून देतात.

रथ आहे खरा, पण जर त्याला सारथी म्हणजे चालवणारा नसेल, तर रथ कुठेतरीच जाईल. केवळ गाडी माझी आहे म्हणून ती मालकाला चालविता येणार नाही. साधी बैलगाडी सुद्धा चालविता येणार नाही. आपला देह मनुष्य आपल्या मनाने चालवितो, आणि खड्ड्यामध्ये पडतो. सद्गुरू हे गाडीवानाचे काम करतात आणि आपल्या देहरूपी गाडीला योग्य रस्त्यावरून नेतात. आपण नेहमी भगवंताच्या अनुसंधानात मग्न असावे आणि गाडीवानावर विश्वास ठेवून निर्धास्त असावे, मग कसलाच धोका उरणार नाही; आपल्या नशिबात जेवढे मिळायचे असेल तेवढेच आपल्याला मिळणार, अशी वृत्ती बनून आपले हवेपण कमी होईल.मनाची ही वृत्ती झाली की, जे घडेल ते भगवंताच्या इच्छेनेच घडेल असे आपल्याला वाटू लागेल. असे वाटू लागले की समाधान चालत घरी येईल. पण हे सगळे होण्यासाठी आपल्या अंतःकरणाची शुद्धता हा पाया आहे.

संतचरणी विश्वास । त्याने भगवंत जोडला खास ॥

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर, पुणे

### आपले सण,आपलेउत्सव वट सावित्री पोर्णिमा

पुढे....

वडाभोवती दोरा बांधणे हे पती-पत्नीतील निष्ठा व जन्मोजन्मी जन्मोजन्मीची अखंड सौभाग्य यासाठी असतो. वड जसा दीर्घायुषी असतो तसाच माझा पती ही दीर्घायु व्हावा, अशी कामना स्त्रिया करतात.

वडाच्या झाडामध्ये मुळापाशी ब्रह्मदेव त्याच्या खोडात विष्णू व शाखेत महेश आहेत. असे मानले जाते. त्यामुळे वडाची पूजा ही त्रिदेवांची पूजा असते.

स्कंद पुराणात असे लिहिले आहे की
*वटमुले स्थिता सावित्री पतीव्रत परायणा*
*तस्याप्रसादात भर्तारं पुनर्लब्धवती सती*
*प्रदक्षिणं प्रकुर्वीत वटस्य श्रद्धयान्विता /*
*दीर्घ सौभाग्यमाप्नोती पुत्र पौत्र समंन्विता*

इतर देशांच्या तुलनेत आपल्याकडील कुटुंब व्यवस्था आणखी भक्कम स्थितीत उभी आहे या यशाला सावित्रीची समर्पण भावना त्याग व दृढ निश्चय हा सर्वांना आदर्शभूत असा विषय आहे. तिच्या या कृतीमुळे हजारो वर्षापासून भारतीय स्त्रियांना संसारात कसे राहावे? याचा आदर्श वस्तू पाठ या माऊलीने घालून दिला आहे. त्यामुळेच की काय, आपली कुटुंब व्यवस्था मजबूत आहे. म्हणून या महा तपस्विनी सावित्री च्या चरणी विनम्र होऊन हा भाग इथे संपवूयात.

मधुकर बोरीकर
9403061886

## सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### पाच दृष्टचक्रे'म' ची

आपले जीवन, आयुष्य कसे जगावे, हे कोणी कोणाला सांगत नाही, आणि काही अंशी ते खरेही आहे, हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न.. पण स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नाही!! तसेही समाजभान व स्वाभिमान यांना काबूत ठेवावे हा जनमान्य शिष्टाचार आहे. म्हणून आज मला; "माणसाने 5 दृष्टचक्रे कोणती व त्यात माणूस-स्त्री असो की पुरुष कसा अडकतो व यात अडकू नका हे संतमहात्मे व धर्मग्रंथात सांगितले तरी आपण त्यात फसत जातो. याबद्दल थोडक्यात सांगतो कारण हा फार, मोठा, गहन आणि एका परिशिष्टात मानणारा विषय नाही. ही 5 चक्रे म्हणजे "मी, माझा मला, माझ्यासाठी आणि माझ्याप्रमाणे" ही होय. यात सर्वात मी आहेच. प्रभूरामाने सांगितले की" रावणाला मी नाही तर त्याच्या मी ने मारले."धर्म, देश, देव यासाठी आपला संसार मुले, प्रपंच यावर तुलशीपत्र ठेवली स्वातंत्र्यवीर सावरकराने त्यांनी मी माझा यांना दूर ठेवले! "तुजसाठी जनन ते मरणं, तुजविण मरणं ते जननं "मला काही नको; एखाद्या गोष्टीत कार्यात राहू नही त्यात न गुतंणे, म्हणजे या चक्रातून विनाआसक्ती, उपाधिरहित अवस्था होय. पटत का बघा. 'कोमल वाचेने सर्व लोकासी रे निववावे" हे समर्थ वचन आहे! त्याचे आपण कितपत पालन करतो?? माऊलिनी सुद्धा पसायदान हेच मागितले. जे खल आहेत, दुष्ट आहेत त्याच्या प्रवृत्तीला सांडता येणे म्हणजेच "माझ्यासाठी व माझ्याप्रमाणे यातून मुक्त होणे. तुम्हीआपणही तसा प्रयत्न करूया.. तुर्तास थांबतो. गुड डे व्हेरी गूड़ मार्निंग आणि जय हरी माऊली!



## 'मध' अनेक समस्यांना दूर ठेवण्यासाठी फायदेशीर

ज्योतिर्मय साहित्य

मध खनिजे, जीवनसत्त्वे आणि इतर पोषक तत्वांचा संग्रह आहे. रोगप्रतिकार शक्ती बळकट करण्याव्यतिरिक्त, मध अनेक प्रकारच्या समस्या दूर करण्यात देखील प्रभावी आहे.

आजच्या काळात प्रत्येकाने आपल्या आरोग्याबाबत सतर्क होण्याची गरज आहे. विशेषतः प्रत्येकाला आपली प्रतिकारशक्ती बळकट करण्याची गरज आहे. अशा परिस्थितीत आपल्यासाठी मधाचे सेवन करणे फायदेशीर ठरू शकते. मध खनिजे, जीवनसत्त्वे आणि इतर पोषक तत्वांचा संग्रह आहे. रोगप्रतिकार शक्ती बळकट करण्याव्यतिरिक्त, मध अनेक प्रकारच्या समस्या दूर करण्यात देखील प्रभावी आहे. आयुर्वेदात याचा उपयोग सर्व रोग बरे करण्यासाठी केला जातो. चला तर, जाणून घेऊया मधातील या औषधी फायद्यांविषयी अधिक माहिती...

मधापासून घरगुती उपचार :

खोकल्याचा त्रास बराच काळ बरा होत नसेल, तर मधाचे सेवन करणे खूप उपयुक्त ठरू शकते. मधात बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारे गुणधर्म असतात, जे संसर्ग रोखतात. तसेच, मध कफ सहजपणे काढून टाकतो. आपण एखादा चमचा नुसता मधही खाऊ शकता. याशिवाय आल्याच्या रसामध्ये मध मिसळून खाल्याने कफ आणि खोकल्यात खूप आराम मिळतो.

वजन कमी करण्यासाठी देखील मध खूप उपयुक्त आहे. त्यात अजिबात चरबी नसते. याशिवाय मध कोलेस्टेरॉलची पातळी देखील नियंत्रित करतो. वजन कमी करण्यासाठी आपण कोमट पाण्यामध्ये मध मिसळून, ते पाणी सकाळी रिकाम्या पोटी पिऊ शकता.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

घसा खवखवणे या समस्येतून आराम देण्यासाठी देखील मध फार प्रभावी आहे. जर, तुम्हाला घसा खवखवणे किंवा घसा दुखण्याची असेल, तर मध सेवन केल्यास खूप आराम मिळेल.

बद्धकोष्ठता हे बऱ्याच रोगांचे मूळ आहे. बद्धकोष्ठतेचा त्रास दूर करण्यासाठी मधाचे सेवन खूप फायदेशीर ठरते. नियमित सेवन केल्यास पोटातील गॅस आणि अपचनापासूनही मोठा आराम मिळतो.

मधात बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारे आणि विरोधी दाहक गुणधर्म असतात. कोणत्याही ठिकाणी सूज किंवा वेदना असल्यास किंवा जखम झाली असल्यास थेट त्या जागी मध लावू शकता. यामुळे भरपूर आराम मिळेल.

जर तुमची त्वचा खूप कोरडी असेल, तर त्वचेमध्ये नैसर्गिक ओलावा येण्यासाठी मधाचा वापर केला जाऊ शकतो. यासाठी आपण केवळ मध चेहऱ्यावर फेसपॅक म्हणून वापरू शकता.

***

## प्रभातपुष्प

### षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371


**आला पावसाळा**

आला पावसाळा पहा
सुटला थंड वारा
जलधारा वेगे धावल्या
माती चुंबनासाठी आतूर
ओढ मिलनाची लागली
ढगातुनी अवनीवरी आल्या

आला पावसाळा छान
धरतीच्या मिलना पहा
प्रीतगंध चौफेर दरवळला
वसुंधरा सुंदर नवचैतन्याने
सजली ती नववधूसम
हिरवळीचा साज चढला

# स्व.मा.आ. केशवरावजी धोंडगे : मन्याड खोऱ्यातील लढावू-झुंजार व्यक्तीमत्व

ज्योतिर्मय साहित्य



लाल कंधारी गोवंशाच्या इतिहासाचा मागोवा घेतला, तर स्वर्गीय मा. आ. केशवरावजी धोंडगे साहेब यांचे नाव अत्यंत आदराने आणि अभिमानाने घेतले जाईल. कारण, १९९२ पूर्वी या देशी गोवंशाला अखिल भारतीय स्तरावर अधिकृत मान्यता नव्हती. या दुर्लक्षित पण गुणवान गोवंशाला राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळावी, यासाठी धोंडगे साहेबांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या अथक प्रयत्नांना अखेर यश आले आणि १९९२ मध्ये लाल कंधारी गोवंशाला अखिल भारतीय स्तरावर अधिकृत मान्यता प्राप्त झाली. हा क्षण केवळ मराठवाड्यासाठीच नव्हे, तर देशी पशुधन संवर्धनाच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला.

या मान्यतेनंतर सप्टेंबर १९९३ मध्ये चेन्नई येथे भरलेल्या अखिल भारतीय पशुप्रदर्शनात उम्रज (ता. कंधार) येथील श्री. रावसाहेब भूते यांच्या लाल कंधारी गायीची उत्कृष्ट पशुधन म्हणून निवड होऊन राष्ट्रीय सन्मान प्राप्त झाला. हा पुरस्कार संपूर्ण लाल कंधारी गोवंशासाठी अभिमानाचा क्षण होता.

या ऐतिहासिक यशाचा गौरव करण्यासाठी कोजागिरी पौर्णिमेच्या चांदण्यांनी उजळलेल्या रात्री, ऑक्टोबर १९९३ मध्ये, जयक्रांती भवन येथे धोंडगे साहेबांच्या पुढाकाराने राष्ट्रीय स्तरावर गौरव प्राप्त लाल कंधारी पशू आणि त्यांच्या पशुपालकांचा जाहीर सत्कार आयोजित करण्यात आला. हा सोहळा केवळ सत्काराचा नव्हता, तर देशी गोवंश संवर्धनासाठी आयुष्य वाहणाऱ्या शेतकरी आणि पशुपालकांच्या कष्टांचा सन्मान होता.

काही माणसे काळाच्या पडद्याआड जातात, पण त्यांचे विचार, कार्य आणि प्रेरणा समाजाच्या मनावर कायमची कोरली जाते. अशा व्यक्तिमत्त्वांना श्रद्धांजली म्हणजे केवळ शब्दांचा उपचार नसतो; त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेणे, हेच त्यांना वाहिलेले खरे अभिवादन असते. ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, लोकनेते, साहित्यिक आणि समाज प्रबोधनाची अखंड ज्योत असलेले स्व. केशवराव धोंडगे यांचे जीवन असेच एका असामान्य पर्वाचे नाव होते.

केशवराव हे एका चौकटीत मावणारे व्यक्तिमत्त्व नव्हते. राजकारण, समाजकारण, साहित्य, पत्रकारिता, शिक्षण, जनआंदोलने, इतिहास संवर्धन आणि राष्ट्रप्रेमज्या क्षेत्रात त्यांनी पाऊल ठेवले, त्या प्रत्येक क्षेत्रावर त्यांनी स्वतः ची वेगळी छाप उमटवली. प्रखर स्वाभिमान, निर्भीड भूमिका आणि जनतेच्या प्रश्नांशी असलेली त्यांची अखंड बांधिलकी ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख होती.

कंधारचा उल्लेख झाला की केशवराव धोंडगे हे नाव आपोआप समोर यायचे. कारण त्यांनी कंधारवर केवळ प्रेम केले नाही, तर त्यासाठी आयुष्य अर्पण केले. सहा वेळा विधानसभा सदस्य तर एकदा संसद सदस्य म्हणून सभागृहातील लोक प्रश्नाला वाचा फोडणारे नेते म्हणून कार्यकिर्द राहीलेली आहे.दुर्गम खेड्यापाड्यांत पायी फिरून त्यांनी लोकांचे प्रश्न जाणून घेतले. ग्रामीण भागात रस्ते, शाळा, पाणी आणि विकासा च्या सुविधा पोहोचविण्यासाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला. लोकप्रतिनिधी म्हणजे जनतेचा सेवक, हे त्यांनी आपल्या कृतीद्वारे सिद्ध केले.

सत्ताधाऱ्यांना धारेवर धरण्याची त्यांची शैली आगळीच होती. त्यांचे भाषण म्हणजे विचारांची मेजवानी, तर उपरोध आणि विनोद यांचा अप्रतिम संगम. त्यांच्या आंदोलनांतही कल्पकता होती. अन्याया विरुद्धचा प्रत्येक लढा त्यांनी लोकांचा उत्सव बनवला. त्यामुळे त्यांची आंदोलने केवळ संघर्ष नव्हती, तर जन जागृती ची प्रभावी माध्यमे ठरली.




तत्त्वांशी तडजोड हा शब्द त्यांच्या शब्दकोशात नव्हता. आयुष्यभर शेतकरी कामगार पक्षाच्या विचारांशी ते एकनिष्ठ राहिले. सत्ता, पद किंवा स्वार्थ यासाठी त्यांनी कधीही विचारांचा व्यापार केला नाही. ही निष्ठा आजच्या राजकीय संस्कृतीत दुर्मीळ वाटावी अशीच आहे.

लेखक आणि संपादक म्हणूनही त्यांचे योगदान तितकेच महत्त्वाचे आहे. जयक्रांती साप्ताहिकातून त्यांनी निर्भीड लेखन केले. उपेक्षित, भटके, शेतकरी, कष्टकरी आणि समाजाच्या शेवटच्या घटकाच्या वेदनांना त्यांनी शब्द दिले. त्यांच्या लेखणीतून समाजाला विचार मिळाला, तर त्यांच्या कृतीतून संघर्षाची दिशा.

राष्ट्रप्रेम त्यांच्या रक्तातच होते. विधिमंडळात वंदे मातरम सुरू करण्यासाठी त्यांनी केलेला आग्रह असो किंवा कंधारच्या राष्ट्रकूट वारशाचे जतन करण्यासाठी घेतलेली धडपड असोत्यांच्या प्रत्येक कृतीत राष्ट्र, संस्कृती आणि समाज यांच्या प्रती असलेली निष्ठा दिसून येते.

आज त्यांच्या जाण्याने एका युगाचा अंत झाला आहे. पण त्यांनी जागवलेला स्वाभिमान, त्यांनी दिलेली लढण्याची हिंमत, त्यांनी निर्माण केलेली विचारांची परंपरा आणि त्यांनी चेतविलेली जनजागृतीची मशाल पुढील अनेक पिढ्यांना दिशा देत राहील.

केशवराव धोंडगे हे केवळ एक व्यक्तिमत्त्व नव्हते; ती एक विचारधारा होती, एक चळवळ होती, एक जाज्वल्य प्रेरणा होती. अशा या महान झुंजार व लढावू लोकनेत्यास विनम्र अभिवादन!

## केशव माधव विश्वस्त निधीतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ

ज्योतिर्मय साहित्य

पुणे – प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यश संपादन केलेल्या यंदाच्या इयत्ता दहावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या गरीब व होतकरू असलेल्या चाळीस गुणवंत विद्यार्थांच्या सत्कार समारंभाचे आयोजन केशव माधव विश्वस्त निधी या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

केशव माधव विश्वस्त निधी या संस्थेचे अश्या कार्यक्रम आयोजनाचे यंदाचे हे दहावे वर्ष आहे.

एरंडवणे येथील कर्नाटक शाळेसमोरील छत्रे सभागृहा मध्ये शनिवार दिनांक २५ जुलै रोजी सकाळी दहा वाजता होणाऱ्या कार्यक्रमास अध्ययन क्षेत्रात गेले पन्नास वर्षापासून योगदान देणारे हरिभाऊ धोंडो गोखले हे प्रमुख पाहुणे असणार असून अध्यक्षस्थानी केशव माधव विश्वस्त निधीचे अध्यक्ष रवींद्र जावळे हे असणार आहेत.

कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे सचिव अरविंद देशपांडे यांनी केले आहे. कार्यक्रम यशस्वितेसाठी संस्थेचे विश्वस्त कविता शेंडे, अमोल जोशी, योगेश कुलकर्णी, प्रकाश देशपांडे, प्रशांत कुलकर्णी, संजय वळसंगकर प्रयत्नशील आहेत.

साहित्यिक मित्रांनो,
आता लिहा बिनधास्त कारण आता तुमच्या साहित्याला प्रकाशित करण्यासाठी आले आहे एक भव्य व्यासपीठ
ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ
"ज्योतिर्मय" साहित्याचे विद्यापीठ.
साहित्यावरील प्रत्येक घटना, कथा, कविता, लेख, परीक्षण, पुरस्कार, संमेलन प्रत्येकाची नोंद आम्ही घेणार, मग विचार कसला करता!
हो जाओ शुरु....
या व्यासपीठावर तुमचे सर्वांचे स्वागत आहे.
- संजय व्यापारी, संपादक 7743918559
ज्योतिर्मय-साहित्याचे विद्यापीठ

## सेवा भवन प्रकल्पाला आवश्यक साहाय्य निश्चितपणे करू - महापौर

ज्योतिर्मय साहित्य



पुणे – राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समितीतर्फे सेवा भवन येथे चालवले जाणारे सेवेचे उपक्रम निश्चितच कौतुकास्पद असून या प्रकल्पाला आवश्यक असणारे सर्व साहाय्य आम्ही निश्चितपणे करू, असे मनोगत महापौर मंजुषा नागपुरे यांनी व्यक्त केले.

महापौर मंजुषा नागपुरे, महापालिकेतील गटनेता गणेश बीडकर आणि भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी सेवा भवन प्रकल्पाला भेट देऊन संपूर्ण प्रकल्पाची पाहणी केली. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात महापौर बोलत होत्या. महापौर नागपुरे यांनी सेवा भवन प्रकल्पातील डायलिसीस सेंटरची पाहणी केली आणि डायलिसीस सेंटरचे काम समजून घेतले. विविध सेवाकार्यांचीही माहिती त्यांनी करून घेतली.

डॉ. राजन पंडित आणि डॉ. अजय उपाध्ये यांनी डायलिसीस सेंटरची माहिती महापौरांना आणि महापालिका पदाधिकाऱ्यांना दिली. नगरसेवक पुनीत जोशी, सुनील पांडे, मंजुश्री खर्डेकर, ॲड. मिताली सावळेकर यांचीही यावेळी उपस्थिती होती.

जनकल्याण समितीचे महाराष्ट्र प्रांत कार्यवाह राजन गोऱ्हे, सहकार्यवाह मुकुल पाटगांवकर यांनी पदाधिकाऱ्यांचा सन्मान केला आणि जनकल्याण समितीचे तसेच संघाचे वाङ्मय भेट दिले. सेवा भवन प्रकल्पाच्या अध्यक्षा डॉ. स्वाती बेलसरे आणि संघटनमंत्री पराग कंगले यांनी जनकल्याण समितीचे कार्य तसेच प्रकल्पाची माहिती दिली. संघाचे पुणे महानगर कार्यवाह सचिन भोसले, महानगर प्रचारक रोहित रिसबुड यावेळी उपस्थित होते.




सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.
■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,
गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.
सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.
Dr Shaikh A H - 98606 99906

## कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे



© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495



### रामराज्य (भाग १)

पुढे....

त्यानंतर भरताने श्रीरामांच्या त्या पादुका आपल्या मस्तकावर धारण केल्या आणि शत्रुघ्नासोबत आनंदित होऊन रथात प्रवेश केला.

पादुकांचे सिंहासनावर अधिष्ठान:
नंदिग्राम येथे आल्यावर भरताने पादुकांना राज्याभिषेक केला आणि प्रजेसमोर आपली भूमिका मांडली:

एतद् राज्यं मम भ्रात्रा दत्तं संन्यासवत् स्वयम्।
योगक्षेमवहे चैव पादुके द्वे नमस्कृते॥
(वाल्मीकि रामायण, अयोध्याकाण्ड, ११५.१५)

माझ्या बंधूंनी (श्रीरामांनी) हे राज्य माझ्याकडे एक 'न्यास' (अमानत) म्हणून सोपवले आहे. मी या दोन्ही पूजनीय पादुकांना नमस्कार करतो; या पादुकाच आता राज्याचा योगक्षेम (कल्याण आणि रक्षण) सांभाळतील.

सेवक म्हणून कारभार पाहणे:
भरताने पादुकांच्या छत्राखाली कसे काम केले, याचे वर्णन करणारा हा श्लोक:

छत्रं धारयतश्चापि पादुकाभ्यां महामतिः।
आर्य पादौ पुरस्कृत्य राज्यं चकार सः॥

अर्थ: त्या महाबुद्धीमान भरताने श्रीरामांच्या पादुकांवर राजाप्रमाणे छत्र धरले आणि आपल्या थोरल्या भावाच्या (आर्य रामाच्या) चरणांना समोर ठेवून (त्यांच्या आज्ञेनुसार) राज्याचा कारभार चालवला.

थोडक्यात सांगायचे तर: भरताचे हे 'पादुका राज्य' जगाला हेच शिकवते की सत्ता ही उपभोगासाठी नसून, ती एका उच्च आदर्शाला आणि कर्तव्याला समर्पित राहून चालवण्याची जबाबदारी आहे.

जय जय रघुवीर समर्थ

## मनाची वारी अंतर्मनाचा प्रवास



अमोल बोरीकर 86240 03013

पुंडलीक वरदे हरी विठ्ठल'चा गजर करत, हातामध्ये टाळ-मृदंग घेऊन आणि गळ्यात तुळशीची माळ घालून लाखो पावले पंढरीच्या दिशेने चालतात, ती झाली देहाची वारी. पण जेव्हा ही पंढरीची भौतिक वारी संपते, तेव्हा खऱ्या अर्थाने सुरू होते ती 'मनाची वारी' – म्हणजेच अंतर्मनाचा एक निवांत, खोल आणि तितकाच भावुक प्रवास. देहाने पंढरपूर गाठणे सोपे असते, पण मनाने स्वतःच्या आत डोकावणे आणि तिथे असलेल्या विठ्ठलाचा शोध घेणे, हा प्रवास माणसाला खऱ्या अर्थाने आतून समृद्ध करतो.

पंढरपूरपर्यंत पोहोचण्यासाठी पाय लागतात, पण विठ्ठलापर्यंत पोहोचण्यासाठी निर्मळ मन लागतं. मनाची वारी सुरू होते तेव्हा बाहेरचा रस्ता नसतो; आतला प्रवास असतो. प्रत्येक पावलागणिक अहंकार मागे पडतो. राग वितळतो. मत्सर वाहून जातो. लोभाची पकड सैल होते. मन हळूहळू हलकं होत जातं. आणि मग अंतर्मनात एक शांत स्वर उमटतो–"विठ्ठल... विठ्ठल..."

संत ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव यांची खरी वारी ही केवळ पंढरपूरची नव्हती; ती मन शुद्ध करण्याची होती. म्हणूनच त्यांनी देव शोधण्यापूर्वी मन शुद्ध करण्याचा संदेश दिला.

आज अनेकांना पंढरपूरला जाणं शक्य होत नाही. वय, आजार, जबाबदाऱ्या किंवा परिस्थिती आड येते. पण त्यामुळे विठ्ठल दूर जात नाही. कारण विठ्ठलाला पावलांपेक्षा मनाची ओढ अधिक प्रिय असते. ज्या घरात प्रेम आहे, जिथे आई-वडिलांची सेवा आहे, जिथे दुसऱ्याच्या दुःखात सहभागी होण्याची संवेदना आहे, तिथेच पंढरी आहे.

मनाची वारी म्हणजे रोज स्वतःला विचारणं–
आज मी कोणाचं मन जिंकलं का?
आज मी कोणाला क्षमा केली का?
आज मी कोणाचा अश्रू पुसला का?
आज माझ्या वागण्यात विठ्ठल दिसला का?
या प्रश्नांची उत्तरं "होय" असतील, तर समजा आपण रोज वारी करत आहोत.

मनाची वारी म्हणजे स्वतःच्या मनातील षड्रिपूंवर – काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर यांवर विजय मिळवून मनाला शुद्ध करण्याची प्रक्रिया.

"तुका म्हणे चित्त। शुद्ध करावे प्रथम।
मग तो आत्माराम। भेटे अंतरीच।।"

संतांनी नेहमीच अंतर्मनाच्या या यात्रेला महत्त्व दिले आहे. जोपर्यंत मनात इतरांबद्दल द्वेष, मत्सर आणि अहंकार आहे, तोपर्यंत पंढरीची वारी अपूर्णच राहते मनाची वारी म्हणजे पायांनी चालण्याचा प्रवास नाही; ती अश्रूंनी अहंकार धुण्याची, प्रेमाने नाती जोडण्याची, सेवेने देव शोधण्याची आणि प्रत्येक श्वासात "विठ्ठल... विठ्ठल..." उमलण्याची साधना आहे.

"पायांनी पंढरी गाठणं सोपं आहे... पण मनाने विठ्ठलापर्यंत पोहोचणं, हाच खरा वारीचा प्रवास आहे."

चला तर मग, आपल्या मनालाच पंढरी बनवूया, विचारांना वारकरी बनवूया आणि अंतकरणात वास करणाऱ्या त्या सावळ्या विठ्ठलाच्या चरणी जीवन समर्पित करून हा अंतर्मनाचा प्रवास अधिक सुंदर करूया.

॥ रामकृष्ण हरी ॥



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'आजोबा' (सुरकुत्यांमधील शहाणपण)

'नात्यांचं महावस्त्र' विणताना आपण आतापर्यंत आईची 'मायेची पैठणी', बाबांची 'सह्याद्रीची ढाल' आणि आजीच्या 'संस्कारांची शिदोरी' अनुभवली. या महावस्त्राला अधिक बळकट, समृद्ध आणि आदरयुक्त बनवणारा, कुटुंबाचा भक्कम पाया असणारा आणि अनुभवाचा समृद्ध सुवर्णकळस चढवणारा पुढचा महत्त्वाचा पदर म्हणजेच 'आजोबा'! आजोबा हे नातं म्हणजे वात्सल्य आणि शिस्तीचा एक अद्भूत सुवर्णमध्य आहे. ते कुटुंबासाठी केवळ एक ज्येष्ठ व्यक्ती नसतात, तर 'वात्सल्याची सावली आणि संस्कृतीचा वारसा' असतात, 'अनुभवाचे संचित आणि सुरकुत्यांमधील जिवंत शहाणपण' असतात.

मी आजी-आजोबांसारख्या ज्येष्ठ व्यक्तींना समृद्धीचे 'महावृक्ष' म्हणतो. जंगलातील वृक्ष आपण सगळ्यांनी पाहिले असतील. एक वृक्ष मोठा होण्यासाठी अनेक वर्षे लागतात. कितीतरी उन्हाळे-पावसाळे त्यांनी पाहिलेले असतात; वादळ, वारा, पाऊस स्वतःच्या अंगावर झेललेला असतो. झाडाचे वय कसे काढतात, हे आपण विज्ञानातून शिकलो आहोत. झाडाच्या खोडाचा जेव्हा आडवा छेद घेतला जातो, तेव्हा त्यावर दिसणारी वर्तुळाकार वलये जेवढी जास्त, तेवढे त्या झाडाचे वय अधिक आणि ते झाड तेवढेच जुने व समृद्ध मानले जाते. अशाच सुरकुत्या जेव्हा आजोबांच्या अंगावर आपल्याला दिसतात, तेव्हा त्या केवळ वयाचे लक्षण नसून त्यांच्या समृद्ध आयुष्याचं आणि अथांग अनुभवाचं दर्शन घडवणाऱ्या असतात. (क्रमशः)...

# भरतनाट्यम के मनोरम नृत्यानुबन्ध की अनुभूती

## कुमारी अनुभूती बॅनर्जी का रमणीय भरतनाट्यम अरंगेत्रम (रंगप्रवेश) ठाणे में संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

ठाणे स्थित प्रतिष्ठित सांस्कृतिक संस्थान संस्कृति अकादमी ऑफ फाइन आर्ट्स द्वारा संचालित दस वर्षों के समर्पित प्रशिक्षण की परिसमाप्ति करता हुआ कुमारी अनुभूती बॅनर्जी के भरतनाट्यम अरंगेत्रम कार्यक्रम का सुंदर मांगलिक समापन ११ जुलाई, २०२६ को ठाणे के राम गणेश गडकरी रंगायतन के भव्य सभागार में हुआ। यह सांस्कृतिक संस्थान १९९८ से सक्रिय है। अनुभूती ने पिछले एक साल से अपनी श्रध्येय गुरु नाट्याचार्य आशा सुनीलकुमार के स्नेहपूर्ण और अनुशासित मार्गदर्शन में इस नृत्य पदार्पण के लिए अत्यधिक कड़ी मेहनत की थी। अनुभूती और उनकी नृत्य-सखियाँ अग्रणी मिश्रा और नेहा भट का मनमोहक नृत्यानुबन्ध पूरे कार्यक्रम में स्पष्ट रूप से दिखाई दिया। भरतनाट्यम तमिलनाडु की अभिजात नृत्य शैली है, फिर भी अनुभूती को इसमें बाल्यवस्था से ही रुचि होने के कारण दक्षिण भारतीय भाषाओं के गीत-संगीत से उसकी शिक्षा में कभी बाधा नहीं पहुँच पायी। यह गर्व की बात है कि भरतनाट्यम का प्रशिक्षण लेते हुए अनुभूती ने इस वर्ष आईसीएसई बोर्ड की १० वीं कक्षा की कठिन परीक्षा ९६% अंकों के साथ सफलतापूर्वक उत्तीर्ण की।


भरतनाट्यम शब्द का उद्गम देखें तो, भा अक्षर भाव (भावाभिव्यक्ती) को दर्शाता है, रा राग (सुर-संगीत) को और ता ताल (लयबद्धता) को। नाट्यम तमिलनाडु का नृत्य रूप है। नटराज के तांडव और पार्वती के लास्य से आरम्भ हुई यह नृत्य शैली आज तक अनगिनत नर्तक-नर्तकियों द्वारा संरक्षित की गई है।जब छात्रा शिष्य गुरु के मार्गदर्शन में नृत्याभ्यास करके पर्याप्त नृत्य कौशल प्राप्त कर लेती है, तभी गुरु उसे एकल मंच प्रवेश, अर्थात् अरंगेत्रम प्रस्तुत करने की अनुमति देते हैं। नृत्याभ्यास के इस महत्वपूर्ण चरण को पार करने के बाद, शिष्य स्वतंत्र रूप से नृत्य कार्यक्रम प्रस्तुत करता है।

अनुभूती के अरंगेत्रम में भरतनाट्यम नृत्य के सभी मूलभूत प्रारूप समाविष्ट थे। प्रारंभ में, श्री गणेश की स्तुति के बाद, शारदा स्तवन प्रस्तुत किया गया। इसमें, महान कवयित्री शांता शेळके जी के लोकप्रिय मराठी गीत जय शारदे वागीश्वरी पर तीन युवा नृत्यांगनाओं के सुरम्य भरतनाट्यम प्रदर्शन ने दर्शकों को मंत्रमुग्ध कर दिया। महाराष्ट्र और तमिलनाडु का यह कला-संगम अकल्पनीय था।

तीनों नर्तकियों का दूसरा अत्यंत कुशल नृत्य जतीस्वरम था। यह एक शुद्ध नृत्य शैली (नृत्त) है, जिसमें विभिन्न जती यानी छोटे-छोटे लयबद्ध टुकड़े और स्वरों का संयोजन शामिल होता है। यह नर्तिका की लय, तकनीक और अवकाशीय संरचना पर प्रभुत्व को दर्शाता है। चूंकि इसमें कोई कथानक नहीं होता, इसलिए अभिनय का महत्व न होकर सारी अहमियत नर्तिका की लावण्यमय गतिविधियों और स्वर एवं लय के आपसी समन्वय पर केंद्रित होती है।


तीसरा नृत्य आदि जगद्गुरु श्री शंकराचार्य भगवतपाद द्वारा रचित ''शिव पंचाक्षरमंत्र स्तोत्र'' का प्रस्तुतीकरण था! इसमें भगवान शिव के शारीरिक सौंदर्य का विस्तृत वर्णन है। इस रचना का वैशिष्ट्य यह है कि, प्रत्येक श्लोक का पहला अक्षर 'नमः शिवाय' मंत्र के 'न', 'म', 'शि', 'वा' और 'या' अक्षरों से प्रारंभ होता है। इसमें तीनों नर्तकियों ने शिवलीला के अंतर्गत गंगावतरण, देवी सती का आत्मदाह एवं शिव शंकर द्वारा प्राशन किये गए हलाहल के हृदयंगम प्रसंगों का भावभीना प्रदर्शन किया।


चौथा नृत्य रूप, वर्णम, छात्रों के प्रशिक्षण की कठिनतम परीक्षा होती है। अरंगेत्रम में, वर्णम सर्वाधिक चुनौतीपूर्ण केंद्रीय स्थान पर विराजमान रहता है, क्योंकि इसमें दो आवश्यक पहलू समाहित हैं: नृत्त, अर्थात् शुद्ध नृत्य, और अभिनय, अर्थात् भावाभिव्यक्ति की सशक्त प्रस्तुति एवं प्रभावशाली कथा कथन! ये कथाएँ अक्सर पारंपरिक होती हैं। यहाँ नर्तकी शारीरिक क्षमता और भावनात्मक परिपक्वता, इन दोनों में अपने कौशल का सम्पूर्ण रूप से प्रदर्शन करती है। इस अरंगेत्रम में दर्शकों को भगवान विष्णु के विभिन्न अवतारों की झलक देखने को मिली। अनुभूती द्वारा धारण किया गया नृसिंहावतार दर्शकों को सम्मोहित कर गया। साथ ही, गजेंद्र-मोक्ष के दृश्य में उसके द्वारा चित्रित मगरमच्छ बेहद वास्तविक लग रहा था। इसके अलावा, तीनों ने अपने नृत्याभिनय से वामनावतार, अहल्या- उद्धार, अर्जुन को कृष्ण द्वारा किया गया गीतोपदेश और पद्मनाभ-स्तुति जैसे दृश्यों को पूर्णतया जीवंत कर दिया।







मध्यांतर के दौरान, अनुभूती, उसके माता-पिता श्री उज्ज्वल और श्रीमती आरती बॅनर्जी के साथ अन्य छात्राओं एवं उनके अभिभावकों ने आदरणीय गुरु नाट्याचार्य श्रीमती आशा सुनीलकुमार और इन छात्राओं को प्रशिक्षित करने वाली संस्कृति अकादमी की शिक्षिकाओं को तालियों की गड़गड़ाहट सहित सम्मानित किया। साथी संगीत कलाकार: गायक (डॉ. कृष्णमूर्थी और कुमारी कीर्थना कृष्णन), मृदंगम (श्री दक्षिणामूर्थी), वायलिन (श्री बालसुब्रमण्यन), बांसुरी (श्री भास्कर नागराजन) और घटम (कुमारी विभा विश्वेश्वरन) इन सब का सत्कार किया गया। इसके अलावा पार्श्वसंगीत, प्रकाश व्यवस्था, मेकअप, वेशभूषा, केशभूषा आदि में योगदान देने वाले सहयोगियों को भी सम्मानित किया गया। आदरणीय गुरु आशा जी ने तीनों छात्राओं को सुंदर दीवट भेंट किये, इस आशा के साथ कि उनकी तीनों छात्राएं उन्हें प्राप्त हुए अभिजात कला-प्रशिक्षण की लौ सदा प्रज्वलित रखेंगी। नाट्याचार्य ने तीनों छात्राओं को प्रमाण पत्र भी दिए। इस भावपूर्ण सम्मान समारोह में नाट्याचार्य आशा जी ने अपने विचार व्यक्त करते हुए इस बात पर जोर दिया कि भरतनाट्यम कला में उनकी लाड़ली शिष्याओं को निरंतर प्रशिक्षण लेते रहना कितना महत्वपूर्ण है।अनुभूती के अभिभावकों ने इस महान समर्पित नृत्य-गुरु के प्रति हार्दिक आभार व्यक्त किया।









मध्यांतर के बाद, तीनों युवा नर्तिकाओं को एकल नृत्य प्रस्तुत करने का बेहतरीन अवसर मिला। अनुभूती ने बंग भूमि की अति प्रिय एवं पूजनीय महिषासुरमर्दिनी के अवतार पर आधारित बंगाली नृत्य दुर्गास्तुति प्रस्तुत किया। इस भक्तिरस से परिपूर्ण नृत्य में अनुभूती ने अपने अद्वितीय नृत्याभिनय के माध्यम द्वारा देवी के त्रिविध रूपों (सत्व- सरस्वती, रज- लक्ष्मी और तम- पार्वती) को प्रकट किया। एक ओर ब्रह्मा, विष्णु, महेश और अन्य देवताओं द्वारा प्रदत्त विभिन्न शस्त्रों से सुसज्जित दुर्गा देवी तो दूसरी ओर अहंकार से मदोन्मत्त महिषासुर का कराल रूप धारण करते हुए दुर्गा नवरात्रि के नौ दिनों तक चले भयंकर युद्ध के प्रसंग में अनुभूती के क्रोधाग्नि ने दर्शकों को रोमांचित कर दिया। इसी नृत्य के दौरान जब उसने मिट्टी के पारंपरिक धूपदानियों को दोनों हाथों में रखकर दुर्गापूजा का प्रसिद्ध बंगाली धुनुची नृत्य किया तब समूचा प्रेक्षागार तालियों की गड़गड़ाहट से गूंज उठा। अनुभूती के इस भावोत्कट नृत्य कौशल की पराकाष्ठा देख दर्शक विस्मयचकित हो गए।

अन्य एकल नृत्य शैलियों में, नेहा ने कृष्णावतार के एवं अग्रणी ने रामायण के दृश्य प्रस्तुत किए।


तीनों कलाकारों द्वारा प्रस्तुत नृत्य शैली थिल्लाना ने दर्शकों को असीम आनंद का अनुभव कराया। हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत के तराना को भरतनाट्यम में थिल्लाना के रूप समाहित किया गया है। यह अत्यंत जटिल और पेचीदा शुद्ध नृत्य शैली (नृत्त) कार्यक्रम के अंत में प्रस्तुत की जाती है। यहाँ नृत्य संगीत द्वारा नर्तकी की निपुणता उसके जटिल पदन्यास एवं मनमोहक मुद्राओं में प्रतिबिंबित होती है।

इस नृत्य को प्रसन्नता और सुख के सर्वोच्च बिन्दु का प्रतीक माना जाता है। थिल्लाना नृत्य में अनुभूती के थिरकते पदविन्यास का कोई सानी नहीं था। कई वर्षों तक की हुई उसकी अथक नृत्यसाधना इस प्रदर्शन में स्पष्ट रूप से दृश्यमान हो रही थी। इस नयनाभिराम प्रस्तुति के बाद, कार्यक्रम के अंतिम चरण में अनुभूती और उसकी नृत्य-सखियों ने भगवान श्रीराम की स्तुति में मंगलम नृत्य किया। इस दौरान उन्होंने नृत्य के माध्यम से भगवान नटराज, अन्य देवगण, उनकी गुरु नाट्याचार्य श्रीमती आशा सुनील कुमार, संगीत साथी और दर्शकों को विनयपूर्वक प्रणाम किया।

इस अभूतपूर्व आयोजन के समाप्त होने के पश्चात भी, नर्तकियों के सम्मान में खड़े हुए दर्शकों की करतल ध्वनि रुकने का नाम नहीं ले रही थी। गैलरी समेत गडकरी सभागार दर्शकों से खचाखच भरा हुआ था, यहाँ तक कि कुछ लोगों को खड़े रहकर ही इस कार्यक्रम को देखना पड़ा। अनुभूती के कई सगे सम्बन्धी, मित्र और शुभचिंतक उसे आशीर्वाद देने और उसके अच्छे भविष्य की कामना करने के लिए कार्यक्रम में विशेष रूप से उपस्थित थे। अपने अविस्मरणीय प्रदर्शन से दर्शकों को एक अलौकिक अनुभव देने वाली इस उभरती युवा नृत्य कलाकार अनुभूती बॅनर्जी को समाज के हर वर्ग से अपार सराहना मिल रही है। उसकी आगे की शिक्षा और कलात्मक प्रशिक्षण के लिए हार्दिक शुभकामनाएं!

***


✍️ डॉ. मीना श्रीवास्तव ठाणे.
मो. 99201 67211




## कवितेच्या लाटावर...

कवितेच्या लाटावर...


















हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# २२ जुलै रोजी राष्ट्रीय व राज्यस्तरीय सायकल स्पर्धेचे आयोजन; ४२५ हून अधिक खेळाडूंचा सहभाग

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे – पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे भूतपूर्व अध्यक्ष व महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त बुधवार, दिनांक २२ जुलै २०२६ रोजी भव्य राष्ट्रीय व राज्यस्तरीय सायकल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे हे सलग १० वे वर्ष असून, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया आणि सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या मान्यतेने संस्थेच्या वतीने ही स्पर्धा घेतली जात आहे.

विविध गटांत होणार स्पर्धा, ६ लाखांची बक्षिसे

या स्पर्धेत देशभरातून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील सुमारे ४२५ सायकलपटू सहभागी होणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने दिनेश कुमार, युवान सप्रू, गंगा दांडीन, सविता हडगळ, श्रावणी परीट यांसारख्या नामवंत खेळाडूंचा समावेश आहे. सर्व वयोगटांतील विजेत्यांसाठी एकूण ६,००,००० रुपयांची रोख बक्षिसे व स्मृतीचिन्हे दिली जाणार आहेत. तसेच प्रसिद्ध दिवे घाट प्रथम पार करणाऱ्या सायकलपटूला ‘‘घाटाचा राजा‘‘ हा मानाचा पुरस्कार प्रदान केला जाईल.

स्पर्धेचे वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे:

१. पुणे ते बारामती (पुरुष राष्ट्रीय स्तर) १२२ कि.मी.

२. पुणे ते बारामती (पुरुष राज्य स्तर) १२२ कि.मी.

३. सासवड ते बारामती (पुरुष खुली स्पर्धा व सायक्लोथॉन रॅली) ८५ कि.मी.

४. माळेगाव ते बारामती (महिला राष्ट्रीय स्तर) १५ कि.मी.

शनिवारवाडा येथे भव्य उद्घाटन व जनजागृती रॅली

बुधवार, २२ जुलै रोजी सकाळी ठीक ८.०० वाजता शनिवारवाडा, पुणे येथून स्पर्धेचा शानदार उद्घाटन सोहळा संपन्न होईल. यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सुनील तटकरे, खासदार पार्थ पवार, आमदार दिलीप वळसे पाटील, कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आणि महापौर मंजूषा नागपुरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहतील.

आरोग्य, पर्यावरण आणि वाहतुकीचा समतोल राखण्यासाठी शनिवारवाडा ते हडपसर या न्युट्रल झोन मार्गावर एका विशेष सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये सुमारे ३००० ते ३५०० विद्यार्थी, शिक्षक, ज्येष्ठ नागरिक आणि कार्यकर्ते सहभागी होऊन प्लास्टिकमुक्ती, स्वच्छता आणि प्रदूषण मुक्तीचा संदेश देणार आहेत. त्यानंतर सकाळी ९.०० वाजता हडपसर (ग्लायडिंग सेंटर) येथून मुख्य राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्पर्धेला कृषीमंत्री दत्तात्रय भरणे व अन्य मान्यवरांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवला जाईल. ही मुख्य स्पर्धा वडकीनाला, दिवे घाट, सासवड, जेजुरी, निरा, सोमेश्वरनगर मार्गे बारामती येथील विद्या प्रतिष्ठान येथे समाप्त होईल. तसेच सासवड येथे सकाळी १०.१५ वाजता दिगंबर दुर्गाडे, विजय शिवतारे व संजय जगदाळे यांच्या उपस्थितीत ८५ कि.मी. अंतराच्या स्पर्धेचे उद्घाटन होईल.

दुपारी २ वाजता बारामतीत बक्षीस वितरण

स्पर्धेचा सांगता व बक्षीस वितरण समारंभ दुपार २.०० वाजता ग.दि.मा. सभागृह, बारामती येथे आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, विधानसभा उपाध्यक्ष आण्णा बनसोडे, खासदार सुप्रियाताई सुळे, आमदार रोहित पवार आणि युवा नेते जयदादा पवार यांच्या शुभहस्ते पार पडेल.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाची शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील यशस्वी घोडदौड

कै. बाबुरावजी घोलप यांनी ७ सप्टेंबर १९४१ रोजी बहुजन हिताय बहुजन सुखाय हे ब्रीदवाक्य घेऊन स्थापन केलेल्या या संस्थेची सुनेत्राताई पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वेगाने प्रगती होत आहे. आज संस्थेच्या एकूण १४५ हून अधिक शाखांमधून ९०,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. नुकत्याच झालेल्या शैक्षणिक वर्ष २०२५–२६ च्या परीक्षेत संस्थेचा १० वीचा निकाल ९६.६४% तर १२ वी विज्ञान शाखेचा निकाल ९७.८३% लागला आहे. संस्थेच्या




रामकृष्ण मोरे महाविद्यालय (आकुर्डी) व अण्णासाहेब मगर महाविद्यालय (हडपसर) यांना + मानांकन मिळाले आहे, तर निगडी येथील आयुर्वेद रुग्णालयाला राज्यात प्रथम आणि देशात ७ वा क्रमांक मिळाला आहे.

क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रातही संस्थेने मोलाची कामगिरी केली आहे. सन २०१२–१३ ते २०२५–२६ दरम्यान संस्थेच्या खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर १२५, राष्ट्रीय स्तरावर ४२९ आणि राज्य स्तरावर ७३२ अशी एकूण १२८६ पदके पटकावली आहेत. योगासनात रुद्र काळंबे व श्रेयस तरटे, तर डॉजबॉलमध्ये संतोष कोळी यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदके मिळवून देशाचे नाव उज्ज्वल केले आहे. तसेच, पुरुषोत्तम करंडक २०२५ आणि राज्य नाट्य एकांकिका स्पर्धेत संस्थेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. संस्थेचे माजी विद्यार्थी जसे की डॉ. निलेश साबळे, सौम्या कांबळे (बेस्ट डान्सर ऑफ इंडिया), आणि गिरीजा प्रभू हे कलाक्षेत्र गाजवत आहेत.

या सायकल स्पर्धेत व रॅलीमध्ये नागरिकांनी आणि खेळाडूंनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव अ‍ॅड. संदीप कदम आणि खजिनदार अ‍ॅड. मोहनराव देशमुख यांनी केले आहे.

# मराठवाडा अबॅकस स्पर्धेत जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळा, गदाना येथील विद्यार्थ्यांची ऐतिहासिक कामगिरी

## आमदार प्रशांत बंब यांच्या गीताबन अबॅकस बुद्धी चालना उपक्रमाचा दणदणीत यशस्वी ठसा




**ज्योतिर्मय साहित्य**

छ. संभाजीनगर : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता विकसित करून त्यांना आधुनिक स्पर्धात्मक शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने गंगापूरखुलताबाद विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार मा. प्रशांतजी बंब यांच्या दूरदृष्टीपूर्ण संकल्पनेतून सुरू करण्यात आलेला गीताबन अबॅकस बुद्धी चालना हा अभिनव उपक्रम आज ग्रामीण शिक्षण क्षेत्रासाठी प्रेरणादायी ठरत आहे. जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना पूर्णपणे मोफत अबॅकस प्रशिक्षण देण्याच्या या महत्त्वाकांक्षी उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाला नवी दिशा मिळाली असून त्याचे यशस्वी प्रतिबिंब रविवार, दि. १९ जुलै २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेल्या मराठवाडा अबॅकस कॉम्पिटिशन२०२६ मध्ये ठळकपणे दिसून आले.

मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांतील तसेच अनेक नामांकित शाळांतील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या वातावरणात, वेग, अचूकता, स्मरणशक्ती, मानसिक गणित, तार्किक विचारशक्ती आणि एकाग्रतेची कसोटी पाहणाऱ्या या स्पर्धेत जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, गदाना येथील विद्यार्थ्यांनी दिमाखदार यश मिळवत संपूर्ण गंगापूरखुलताबाद तालुक्याचा शैक्षणिक गौरव वाढविला.

या यशामुळे केवळ गदाना गावाचाच नव्हे तर जिल्हा परिषद शिक्षण व्यवस्थेचाही मान उंचावला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सराव आणि दर्जेदार प्रशिक्षण मिळाल्यास ते कोणत्याही मोठ्या व्यासपीठावर आपले वेगळेपण सिद्ध करू शकतात, याचा प्रत्यय या विद्यार्थ्यांनी आपल्या उल्लेखनीय कामगिरीतून दिला.

स्पर्धेतील मानकरी विद्यार्थी : प्रथम क्रमांक –

प्राची अंकुश ठेंगडे, श्रावणी रेवनाथ चव्हाण, जया कैलास बडूगे. द्वितीय क्रमांक : धनश्री अशोक अधाने, राजनंदनी रामहरी चव्हाण, खुशी देवनाथ चव्हाण, समीक्षा रामदास कुकलारेतृतीय क्रमांक : श्रावणी संदीप पाटोळे, वैष्णवी सुनील चव्हाण.चतुर्थ क्रमांक : आदित्य गणेश वाघ, देवयानी पांडुरंग अधाने

या सर्व विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशामुळे गदाना गावात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. पालक, शिक्षक, ग्रामस्थ तसेच शिक्षणप्रेमींनी विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव केला असून या यशामागील मेहनत, शिस्त आणि सातत्यपूर्ण सरावाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या अभिनव उपक्रमाचे प्रेरणास्थान मा. आमदार प्रशांतजी बंब यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाशी जोडण्याचा केलेला प्रयत्न अत्यंत स्तुत्य असून त्यांच्या दूरदृष्टीमुळे हजारो विद्यार्थ्यांना आपल्या बुद्धिमत्तेचे सामर्थ्य सिद्ध करण्यासाठी नवे व्यासपीठ मिळाले आहे. त्यामुळे हा उपक्रम ग्रामीण शिक्षण क्षेत्रातील आदर्श उपक्रम म्हणून ओळख निर्माण करत आहे.

गदाना जिल्हा परिषद गटाच्या सदस्या श्रीमती रेखा प्रकाश चव्हाण यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी भविष्यातही अशाच प्रकारे यश संपादन करून गाव, तालुका आणि जिल्ह्याचे नाव राज्यभर उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

शाळेत विजेत्यांचे ढोल – ताशांच्या गजरात जंगी स्वागत

मराठवाडा अबॅकस स्पर्धेत यश संपादन करून परतलेल्या विद्यार्थ्यांचे सोमवार, दि. २० जुलै २०२६ रोजी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, गदाना येथे अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात जंगी स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळा परिसर आकर्षक पद्धतीने सजविण्यात आला होता. ढोल–ताशांच्या गजरात, पुष्पहार, पुष्पगुच्छ आणि फुलांच्या वर्षावात विजयी विद्यार्थ्यांचे तसेच शिक्षकांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि अभिमान स्पष्टपणे झळकत होता, तर पालक आणि ग्रामस्थांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे अभिनंदन केले. या स्वागत समारंभात मुख्याध्यापिका श्रीमती छाया हिवराळे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी शिक्षिका लतिका बोर्डे, विजयमाला वाघ, परविन सय्यद, आस्मा शेख, शारदा गायकवाड, जयश्री गवळे, रेणुका पिसे तसेच शिक्षक पंढरी तायडे, फिरोज पठाण, साईनाथ चव्हाण आणि अमोल जाधव उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांचे पालक, अंगणवाडी सेविका, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, ग्रामस्थ तसेच शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे टाळ्यांच्या गजरात अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# एमआयटी पॉलिटेक्निक, छत्रपती संभाजीनगर येथे प्रथम वर्ष विद्यार्थीपालक मेळावा उत्साहात संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर – एमआयटी पॉलिटेक्निक, छत्रपती संभाजीनगर* येथे शैक्षणिक वर्ष २०२६२७ मध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा परिचय व संवाद मेळावा आज संस्थेच्या *आनंद हॉल* येथे उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामोद्योगिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष *मा. डॉ. वाय. ए. कवडे* हे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये कार्यकारिणी सदस्य *मा. श्रीमती शीतल देशमुख* तसेच एमआयटी पॉलिटेक्निकचे प्राचार्य *प्रा.११ डॉ. एस. जी. देशमुख* उपस्थित होते.११

यावेळी मार्गदर्शन करताना *मा. डॉ. वाय. ए. कवडे* यांनी विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी पालकांनी संस्थेला मनःपूर्वक सहकार्य करण्याचे आवाहन केले. *प्राचार्य प्रा. डॉ. एस. जी. देशमुख* यांनी व्यावसायिक शिक्षणामध्ये प्रामाणिक परिश्रम, शिस्त आणि सातत्यपूर्ण अभ्यासाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण तांत्रिक शिक्षण, आधुनिक सुविधा आणि सर्वांगीण विकासासाठी संस्था सातत्याने कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमातील संवाद सत्रात पालकांनी संस्थेकडून असलेल्या अपेक्षा व्यक्त केल्या तसेच विविध शैक्षणिक व प्रशासकीय बाबींविषयी प्रश्न उपस्थित केले. या सर्व प्रश्नांची संगणक अभियांत्रिकी विभागप्रमुख *प्रा. अरविंद एस. नागरिक* यांनी सविस्तर व समाधानकारक उत्तरे देऊन पालकांच्या शंकांचे निरसन केले.


या मेळाव्यास १४६ प्रथम वर्ष विद्यार्थी व तितक्याच संख्येने पालक उपस्थित होते. कार्यक्रमास संस्थेतील सर्व विभागप्रमुख तसेच प्रथम वर्ष अध्यापन करणारे सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे समन्वयन प्रा. ए. एस. नागरिक, विभागप्रमुख संगणक अभियांत्रिकी यांनी केले. तसेच त्यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.










# मला गायत्री मंत्राची खरोखर प्रचिती आली. त्यामुळेच मी ३० वर्षांपूर्वी वाचलो

**ज्योतिर्मय साहित्य**

त्यावेळी १९९६ मी एम ए फिलॉसॉफीचा विद्यार्थी असल्यामुळे सतत तत्त्वज्ञानातील काय बाकी आहे याचा अभ्यास करायचा. प्राचीन शास्त्र, संस्कृती, मंत्र, सिद्धी याबाबतीत सतत कुतूहल असायचे. राजस्थानमध्ये नागोर जिल्ह्यामध्ये माझे शिकत असलेले विद्यापीठ होते. संभाजीनगरहून मी अहमदाबाद आणि तिथून पुढे राजस्थान अशा दोन ट्रॅव्हल्स बदलायचो.

असेच एकावेळी मी संभाजीनगरहून निघताना १९९६ , एका मासिकामध्ये गायत्री मंत्र आणि त्याचा अर्थ आणि महत्त्व लिहून आले होते ते पान फाडून घेतले, गायत्री मंत्राबद्दल मला लहानपणापासूनच जिज्ञासा होती. हिंदू धर्मातील एक पवित्र मंत्र अशी खूप ख्याती ऐकून होतो व तो आज प्रत्यक्ष पाहायला मिळाला, याचा आनंद माझ्या मनात होता. प्रवासामध्ये हा मंत्र वाचून याचे चिंतन मनन करावे या अर्थाने मी तो कागद शर्टच्या खिशात ठेवला. संध्याकाळी पाच वाजता गाडी निघाली. गायत्री मंत्र काय आहे आणि खूप ख्याती ऐकून होतो. म्हणून मी तो मंत्र,महत्व रात्री अकरा वाजेपर्यंत वाचत होतो.

गायत्री मंत्र: *ॐ भूर्भुवः स्वः तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि धीयो यो नः प्रचोदयात् ।।*





माझा पाठ सतत सुरू होता. या मंत्राचा अर्थ मंत्राचा मराठी अर्थ:तिन्ही लोकांमध्ये (स्वर्ग, पृथ्वी आणि पाताळ) व्याप्त असलेल्या त्या परम तेजस्वी, श्रेष्ठ आणि पापनाशक सूर्यदेवतेचे (परमेश्वराचे) आम्ही ध्यान करतो। त्या दिव्य शक्तीने आमच्या बुद्धीला सत्सद्विवेकाचा मार्ग दाखवावा आणि चांगल्या कामांसाठी प्रेरित करावे मी सतत मानसिक आवर्तन करत होतो.

दरम्यान संभाजीनगर हून निघाल्याबरोबर : माझा सीट क्रमांक समोरच १ होता. माझ्या बाजूला दुसऱ्याचा नंबर आलेला होता. आणि मला वाटतं नवीन यंग कपल होते.माझ्या बाजूला एक नंबर आणि मागे १२ नंबर वर त्याचा एक नंबर आला,त्यांना दोघांना वेगवेगळे सीट नंबर मिळाले होते.

त्यांनी मला विनंती केली की तुम्ही मागे जाऊन बसता का? आम्हाला इथं दोघांना सोबत बसता येईल.मी लगेचच मान्य केले कारण मलाही अभ्यासासाठी मागची सीट पाहिजे होती.

आणि चांगले म्हणा किंवा वाईट झाले म्हणा ;बडोद्याच्या अलीकडे पहाटे चार वाजता गाडीचा समोर पेट्रोलचा टँकर सोबत मोठा अपघात झाला, दोन्ही वाहन भरपूर स्पीड मध्ये असल्यामुळे ड्रायव्हर, क्लीनर आणि समोरचे सहा लोक जागीच ठार झाले.



© बलराज संघई
(एम.ए. अहिंसा शांति शोध)
छत्रपती संभाजीनगर
9420015108

मी बारा नंबर सीटवर बसल्यामुळे वाचलो परंतु माझ्यापर्यंतचे समोरचे सर्व सीट मोडले होते आणि माझ्यासमोरचे सीट तुटून माझ्या तोंडावर लागले. त्या एका दाताची ट्रीटमेंट दर चार वर्षाला असते,आता उद्याची तारीख आहे.

पुढे अंधारात मी बॅग बाहेर फेकून खिडकीतून उडी मारली, शाल पांघरून पोलिसांना कट मारून एका प्रायव्हेट गाडीत बसलो कारण पोलीस सर्वांना उचलून गाडीमध्ये टाकून सरकारी दवाखान्यात घेऊन जात होते आणि आहमदाबाद गाठले. एक जैन डॉक्टर गाठून त्यांच्या घरी ट्रीटमेंट घेतली.त्यांनी कसलाही खर्च न घेता मला पुढे एक महिन्याच्या गोळ्या दिल्या आणि पुढच्या गाडीत बसवून दिले. माझ्याकडे जैन विद्यापीठात शिकत असलेला आयडी होता.

पुढे मला ठीक व्हायला पंधरा दिवस लागले, कारण तोंड पूर्ण जखमी होऊन बंद झाले होते साईडने स्ट्रॉ मधून दूध+ पीत होतो. विद्यापीठातील मुला मुलींनी माझी काळजी घेतली.

त्यावेळी मला लक्षात आले की हा सर्व गायत्री मंत्राचा परिणाम प्रताप आहे. याची प्रचिती मला आली कारण मी मनोभावे गायत्री मंत्राचा पाठ त्या दिवशी झोप लागेपर्यंत केला होता.

# तोकडे कपडे ही आपली संस्कृती नाही?

ज्योतिर्मय साहित्य
(मागील अंकावरून)

शिवाय दमट वातावरण असल्यानं व अंगावर कपडे घातले की अंगाला ते कसेतरी वाटत असल्यानं साधारणतः ती मंडळी अंगात कपडेच वापरत नाहीत. याचा अर्थ प्रत्येक स्री पुरुषांच्या अंगावर कपडे हे नसतातच किंवा अपुरे कपडे असतातच. शिवाय त्यांना तशा कपड्यात लाज वाटत नाही. कारण त्यांनी आपली मुलं त्यागलेली असतात, पशुपक्षांसारखी. तसंच त्यांचं जीवनही पशुपक्षांसारखंच असतं.



कपडे......ह कपड्याबद्दल सांगायचं झाल्यास जिथं दमट हवामान, तिथं कमी कपडे वापरले जातात. हा प्रकृतीचा एक नियमच आहे. तसंच वाळवंटी प्रदेशात शरीराला त्रास होवू नये म्हणून पुर्ण अंगाला झाकणारे कपडे वापरले जातात. हाही एक प्रकृतीचा नियमच आहे. ती फॅशन नाही तर तो त्या त्या भागातील वातावरणाचा एक परिणाम. मग त्याच गोष्टीला फॅशन समजून आपण वागत गेलोच तर त्याला वातावरणातील बदल वा प्रकृतीचा नियम म्हणता येणार नाही. ते फालतूचं काम झालं, नव्हे तर ते जनावरांसारखं वागणं झालं. मानवी प्राणी हा काही पशुपक्षी नाही की तो पशुपक्षांगत वागेल? तो पशुपक्षांसारखा राहिल? आपल्या जीवनाला आपलं पशुपक्षांसारखं बनवेल? तसं पाहिल्यास वाळवंट प्रदेशातील भागात सुती व काळे कपडे लागतात. जे उष्णता शोषून घेतात. त्यातच तसे कापड इतर भागात अंगावर परिधान केले तर ती फॅशन नाही. त्यांचा अतितायीपणा आहे. तसंच ज्या भागात परिस्थितीला अनुरुप असलेले तोकडे कपडे वापरत असतील तर तिथं त्या त्या परिस्थितीनुसार ते कपडे चांगले असतांना तेच कपडे इतर सुसंपन्न भागात परिधान करीत असतील तर तोही प्रकार आततायीपणाचंच एक उदाहरणच आहे. ती फॅशन नाही. परंतु आपण तो प्रकार आपली एक फॅशन म्हणून स्विकारतो व वापरतो. ज्यातून अनैतिक, अनैसर्गिक कृत्यांना हवापाणी मिळत असतं. गुन्हेगारीला बळ मिळत असतं. सध्या भारत एक सुसंस्कृत देश असून त्याला एक प्रकारची संस्कृती आहे. त्यामुळंच भारतात जरी आज तोकडे कपडे वापरण्याची फॅशन आली असली तरी त्याला या देशात परवानगी नाही. आधीपासूनच या भारतात तोकडे कपडे वापरण्याची फॅशन नाहीच.

तोकड्या कपड्याबाबत सांगायचं झाल्यास तोकडे कपडे भारतातही वापरले जात होते. परंतु केव्हा? जेव्हा माणूस माकड अवस्थेत होता. त्याला कपडे म्हणजे काय? हेही समजत नव्हतं. जेव्हा तो झाडावरुन नुकताच खाली जमीनीवर आला होता. तेव्हा तो झाडाची पानं वा प्राण्यांची कातडीच अंगावर परिधान करायचा. तद्नंतर जेव्हा कापडाचा शोध लागला. तेव्हा माणसानं पुर्ण सीलबंध कपडे वापरणं सुरु केले. तरीही काही जाती व जमाती अशा होत्या की त्या जाती कमी कपडे वापरायच्या. त्याचं कारण होतं, दरिद्री. त्यांना पुरेसे अंगावर घालण्याइतपतही कपडे मिळत नव्हते. ते जनावरांचे कच्चे, सडलेले मांस खात असत. कंदमुळं, झाडांचा पाला खात असत. तसंच त्यांचं जीवन हे पशुसारखंच होतं. आजही काही आदिवासी जमाती अशा आहेत की ज्यांना अंगावर वापरण्याइतपत पुरेसे कपडे मिळत नाहीत. ते कमी कपडे वापरणारच. तसं पाहिल्यास त्यांच्या जीवनाचा अभ्यास केल्यास वा त्यांचे जीवन जवळून पाहिल्यास त्यांचं जीवन हे पशुगतच असतं. ते किड्यामुंग्या, जनावरांचे सडलेले मांस खात असतात. मात्र आज भारतातील काही सुसंपन्न भागात, जिथं पैशाला काही कमी नाही. जिथं अंगावर वापरायला पुरेसे कापड घेता येवू शकतं. तिथं ही तोकडे कपडे वापरण्याची सवय आहे व ही सवय फॅशनच्या नावावर सर्रास सुरु आहे. ही पिढी त्याच आपल्या बिरादरीसारखी मोठमोठ्या रेस्टॉरेंटमध्ये जाते. दारुसारखे मादक पेय पिते व जनावरांचे भाजलेले मांस, त्याला तिखटमीठ लावून मोठ्या आवडीनं खाते आणि मादकता सहन न झाल्यानं पशुसारखाच व्यवहार करते. अर्थात बलात्कार, अनैतिक, अनैसर्गिक संबंध करते. आपली पत्नी दुसऱ्याला व दुसऱ्याची आपल्याला. हा पशुसारखाच व्यवहार असतो व हे पशुसारखंच वागणं असतं. हे कृत्य त्यांच्याबाबतीत बरोबर जरी असलं तरी भारतासारख्या सुसंपन्न व सुसंस्कृत संस्कृतीला शोभणारं कृत्य नाही. शिवाय भारतात पुर्वी ठीक होतं की कापडं अंगावर परिधान करायला मिळायचे नाहीत. कारण गरिबी.




परंतु आज काही भाग जर सोडले तर भारतात गरिबी नाही. मग तोकडे कपडे वापरुन आपल्या सुसंपन्न व सुसंस्कृत संस्कृतीला फॅशनच्या नावावर का बदनाम करावं? देशातील प्रत्येक जीवाला पशुसारखं का समजावं? हो, ठीक आहे, तुम्ही फॅशनच्या नावावर कमी कपडे वापरता? मोठमोठ्या रेस्टॉरेंटमध्ये जाता व जनावरांचे भाजलेले मांस, तिखटमीठ लावून खाता आणि दारुही पिता. परंतु याचा अर्थ असा नाही की तुम्ही निरपराध असलेल्या व तुमचं रानटी जीवन न पाळणाऱ्या, न मानणाऱ्या मानवसंस्कृतीवर आपल्या मादकतेनं बलात्काराचे शिकार करता. हे काही बरोबर नाही. अन्□ जर तुम्हाला ते बरोबर वाटत असेल तर मानवी सुसंपन्न, सुसंस्कृत संस्कृतीत तुम्ही वावरु नये. ज्याप्रमाणे जनावरांचं अधिवास ठिकाण जंगल असतं. तसंच तुम्ही तोकडे कपडे परिधान करीत असल्यानं तुमच्याही अधिवासाचं ठिकाण हे वेगळंच असायला हवं. हे समजून आपलं ठिकाण कोणतं? हे तुम्ही ठरवायला हवं. तिथंच तुम्ही राहायला हवं. उगाचंच इतर भारतातील सुसंपन्न, सुसंस्कृत असलेल्या प्रदेशाकडं तुम्ही येवू नये व येथील सुसंपन्न आणि सुसंस्कृत असलेल्या पिढ्यांना तुम्ही तुमच्या फॅशनच्या नावाखाली बिघडवू नये. जेणेकरुन ही पिढी सुरक्षीत असायला हवी.

महत्वाचं सांगायचं झाल्यास भारत हा सुसंपन्न व सुसंस्कृत देश राहिला आहे आधीपासूनच. जेव्हा या देशाला सुसंस्कृतपणा काय असतो, ते कळलं तेव्हापासून. आपली संस्कृती ही पशुसारखं राहाणं शिकवीत नाही. इथं बाळाला जन्म दिला जातो व त्यांचं संगोपन उत्तम पद्धतीनं केलं जातं. इथं फालतूच्या गोष्टीला थारा नाही. इथं माणूसकी शिकवली जाते व प्रत्येक बाळात सुसंस्कार भरला जातो. तेव्हा फालतूच फॅशनच्या नावाखाली तोकडे कपडे परिधान करुन आपला भारतात असलेला सुसंस्कृतपणा व त्यानुसार वागणाऱ्या सुसंस्कृत पिढीला बिघडवू नये व भारतातील सुसंस्कृत पिढीलाच नाही तर भारतालाही बदनाम करु नये, फॅशनच्या नावाखाली. कारण भारत हा महान आहे, आधीपासूनच आणि येथील संस्कृतीही आधीपासूनच महान आहे. यात शंका नाही.

***




# शब्दांकडे परत फिरू या (समारोप)

ज्योतिर्मय साहित्य

आज तंत्रज्ञान आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे. त्याचा वापर टाळणे शक्य नाही आणि तशी अपेक्षाही नाही. इमोजी, चिन्हे आणि आयकॉन्स यांनाही संवादात निश्चितच स्थान आहे. प्रश्न त्यांच्या अस्तित्वाचा नाही; प्रश्न त्यांच्या अतिरेकाचा आहे.

जेथे चार शब्द आवश्यक आहेत, तेथे एक चिन्ह पुरेसे नाही, कारण शब्द केवळ माहिती देत नाहीत; ते भावना, विचार, संस्कार, अनुभव आणि व्यक्तिमत्त्व व्यक्त करतात.

शब्दांमध्ये विचारांना आकार देण्याची क्षमता आहे. शब्द नाती जोडतात, संस्कृती पुढे नेतात आणि स्मरणशक्ती जागृत ठेवतात, म्हणून शब्दांची जागा चिन्हे पूर्णपणे घेऊ शकत नाही.

आपण प्रत्येकाने आजपासून एक छोटा बदल केला, तरी त्याचे परिणाम दूरगामी असतील. संदेशाला उत्तर देताना शक्य तिथे शब्द वापरू. कुटुंबातील सदस्यांशी अधिक बोलू. मुलांशी संवाद साधू. वाचन वाढवू. लिहिण्याची सवय जोपासू.

लक्षात ठेवू या कि,
शब्द वापरले तरच ते जिवंत राहतात.
शब्द जिवंत राहिले तर भाषा जिवंत राहते.
भाषा जिवंत राहिली तर विचार जिवंत राहतात.

विचार जिवंत राहिले तर त्याबरोबर संस्कृतीचे जतन व संवर्धन होते व ती पुढच्या पिढीकडे व्यवस्थिपणे संक्रमित होते.

तसेच विचार जिवंत राहिले, तर समाजाची सर्जनशीलता आणि स्मरणशक्तीही जिवंत राहते.

म्हणून आजपासून एक छोटासा निर्धार करू या,

''जेंव्हा जेंव्हा शक्य असेल, तेंव्हा तेंव्हा मी केवळ चिन्हे न वापरता, माझ्या भावना शब्दांत व्यक्त करीन.''


कदाचित हा छोटासा बदल आपल्या भाषेला, आपल्या विचारांना आणि आपल्या स्मरणशक्तीला नवसंजीवनी देईल.

# कालिदास - संस्कृत भाषेचे महान सर्वश्रेष्ठ कवी आणि नाटककार

ज्योतिर्मय साहित्य

मागील अंकावरून पुढे...

त्याकाळी पक्षांचा उपयोग संदेशवाहक म्हणून केल्या जात असणार! पण इथे रचनाकार आहेत एकमेकाद्वितीय कवी कालिदास! त्यांची भावानुभूती आणि परिष्कृती ही असामान्य, अनुपमेय, अपरिचित अन अनवट असणारच! म्हणूनच मग उलगडतो राग ''मेघमल्हार''! आषाढ मासाचा प्रथम दिन आणि कृष्णवर्णी, श्यामलतनु, जलनिधीने परिपूर्ण असा मेघ होतो संदेश दूत! पत्ता सांगणे आणि संदेश पोचवणे, बस, इतकीच शॉर्ट अँड स्वीट स्टोरी, पण कालिदासांचा परीसस्पर्श लाभला व हा आषाढमेघ अमर दूत झाला! रामगिरी ते अलकानगरी, मध्ये हॉल्ट उज्जयिनी (वाट वाकडी करून, कारण उज्जयिनी ही कालिदासांची अतिप्रिय रम्य नगरी!) असा मेघाला कसा प्रवास करावा लागेल, वाटेत कुठले माईल स्टोन्स असतील, त्याची विरहव्याकूळ पत्नी (अन मेघाची भावजय बरं का, नो कन्फ्यूजन!) दुःखात विव्हळ होऊन कशी अश्रुपात करीत असेल हे तो यक्ष मेघाला उत्कट आणि भावमधूर काव्यात सांगतोय! यानंतर संस्कृत साहित्यात दूतकाव्यांची जणू फॅशनच आली (त्यातील महत्वाचे म्हणजे नल-दमयंतीचे आख्यान), पण मेघदूतम् हा ''या सम हाच'' राहिला! प्रेमभावनांचा इंद्रधनुषी आविष्कार असणारे, वाचकाला यक्षाच्या विरहव्यथेत व्याकुळ करणारेच नाही तर आपल्या काव्यप्रतिभेने मंत्रमुग्ध करणारे ''मेघदूतम्!'' म्हणूनच आषाढ मासाच्या प्रथम दिनी या काव्याचे आणि त्याच्या निर्मात्याचे स्मरण करणे अपरिहार्यच!


अभिज्ञात शाकुंतलम्




आता कालिदासांच्या महान रचनांचा अत्यल्प परिचय करून देते! या साहित्यात ऋतुसंहार, कुमारसंभवम्, रघुवंशम् व मेघदूतम् या काव्यरचना आहेत, तसेच मालविकाग्निमित्रम्, विक्रमोर्वशीयम् व अभिज्ञान शाकुंतलम् या संस्कृतमधील तीन नाटक-वजा-महाकाव्ये आहेत! आचार्य विश्वनाथ म्हणतात ''वाक्यं रसात्मकं काव्यम्'' अर्थात रसयुक्त वाक्य म्हणजेच काव्य! कालिदासांच्या काव्यरचना आहेत निव्वळ चार! (संख्या मोजायला एका हाताची बोटे पुरेत!)

रघुवंशम् (महाकाव्य): हे महाकाव्य कालिदासांची सर्वोत्कृष्ट काव्यरचना मानली जाते! यात १९ सर्ग असून सूर्यवंशी राजांच्या दैदिप्यमान वंशावलीचे यात तेजस्वी वर्णन आहे. या वंशातील अनेक नायकांचे चरित्र या महाकाव्यात चित्रित केले गेले आहे! सूर्यवंशी राजा दिलीपपासून तर श्रीराम आणि त्यांचे वंशज असे हे या काव्यातील अनेक नायक आहेत. पहिल्या ९ सर्गात श्रीरामांचे चार महान पूर्वज, दिलीप, रघु, अज आणि दशरथ यांचे वर्णन आहे, नंतर १० ते १५ अशा ६ सर्गात रामचंद्रांचे जीवनवर्णन आहे. १६ ते १८ व्या सर्गात श्रीरामांच्या वंशजांचे चित्रण आहे. १९ व्या सर्गात कामुक आणि विलासी अग्निवर्ण याचे वर्णन असून त्याच्या मृत्यूने या काव्याचा शेवट होतो. रघुवंश म्हणजे आदर्शांची जणू वैजयंतीमालाच! या राजांच्या पराक्रमी, दानशूर, प्रजापरायण आणि कीर्तिमान महत्तेचे वर्णन अतिशय उदात्त आहे. शीर्षस्थानी अर्थातच, रघुवंशाची तेजोमय पताका थेट लंकेपर्यंत घेऊन जाणारे आदर्शांचे आदर्श, या वंशाला यशोशिखरावर आस्थापित करणारे, यत्र, तत्र, सर्वत्र पूजनीय असे राघव! कुमारसंभवम् (महाकाव्य): हे आहे कालिदासांचे प्रसिद्ध महाकाव्य! यात शिवपार्वती विवाह, कुमार कार्तिकेयाचा जन्म आणि त्याच्या द्वारे तारकासुराचा वध या प्रमुख कथा आहेत. या महाकाव्यात एकूण १७ सर्ग आहेत. पण काही विद्वान असे मानतात की यातील केवळ प्रथम लिहिल्या गेलेले ८ प्रमाण सर्ग कालिदासांचे, असून बाकीचे नंतर जोडल्या गेले आहेत. उदात्त, सुरम्य, कोमल, भावनावश भावनिवेश, स्वाभाविक आणि तरल कल्पनाविलास, कोमलकांती पद्यरचना, सहज सुंदर शोभतील असे काव्यालंकार, निसर्गाचे चलचित्रासम रमणीय चित्रण हे या महाकाव्याचे गुणविशेष! यात आहे शिवाचे घोर तप, (क्रमशः)

# माऊलींची सावली

ज्योतिर्मय साहित्य

परवाच माझ्या बालमैत्रिणीचा, किर्तीचा, पस्तीस वर्षांनी फोन आला. इयत्ता दुसरी ते चौथी सलग तीन वर्षे आम्ही सावलीसारख्या सोबत होतो. बाकावरची जागा, डब्यातली पोळी, मधल्या सुट्टीतले खेळ... सगळं वाटून घेतलेलं. इतक्या वर्षांनी आवाज ऐकताच मन शाळेच्या पटांगणात जाऊन पोहोचलं. गप्पांना पूर आला आणि आठवणींच्या धारा वाहू लागल्या.




बोलता बोलता कीर्ती म्हणाली, ''सुवे, (माझं माहेरचं नाव सुवर्णा) आठवतंय का? पटवर्धन सरांनी हरिपाठ आणि पसायदान कसं पाठ करून घेतलं होतं?'' मी हसून म्हटलं, ''हो तर! दोन्ही अजूनही तोंडपाठ आहे.'' त्या दोन शब्दांनी हरिपाठ आणि पसायदान मनाच्या गाभाऱ्यात खोलवर रुजलेलं काहीतरी जागं झालं. खूप गप्पांनंतर समक्ष भेटण्याचं ठरवून आम्ही फोन ठेवला, पण पसायदान मात्र मनात पिंगा घालत राहिलं.

त्याच विचारात असताना माऊलींच्या अफाट ज्ञानाचं कुतूहल दाटून आलं. आणि एकदम आजीची आठवण झाली - माझ्या वडिलांची आई, सौ. शारदा गणपतराव देशपांडे. साठीनंतर ज्ञानेश्वरी पाठ करणं अवघड वाटलं म्हणून तिने एक परिपाठ सुरू केला होता. एक ओवी लिहायची, तिचा अर्थ लिहायचा. एकेक शब्द दोन-तीन वेळा तोंडाने म्हणत, आजारपण सांभाळत, तिने ज्ञानेश्वरीच्या नऊ हजार ओव्या पूर्ण लिहून काढल्या होत्या.

तिचं ते लिहिणं म्हणजे अक्षरांतून केलेली पारायणंच होती. पुढच्या पिढीसाठी लावलेला ज्ञानाचा दिवा होता.

संत ज्ञानेश्वर म्हणजे प्रत्येक मराठी माणसाचा मानबिंदू. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी ज्ञानेश्वरीसारखा दिव्य ग्रंथ रचला. तेराव्या शतकात, जेव्हा शिक्षणाची दारं बंद होती, तेव्हा माऊलींनी लिहिलं

जैसें डोळ्यां अंजन भेटे ।
ते वेळी दृष्टीसी फांटा फुटे
मग वास पाहिजे तेथ प्रकटे
। महानिधी ।।

विद्येचा स्पर्श झाला की ज्ञानाची दृष्टी उघडते, भविष्याचा वेध घेता येतो, यशाचा मार्ग दिसतो. किती सोपं करून सांगितलं शिक्षणाचं महत्त्व!




माऊलींचं श्रीकृष्णावर विलक्षण प्रेम होतं. ज्ञानेश्वरीच्या ओवी-ओवीतून त्यांनी त्याचं मनोहरी रूप उलगडलं. ते म्हणतात

जै कृष्णाचेया होईजे आपण । कृष्ण होय आपुले अंतःकरण । ते संकल्पनांचे अंगण । वोळगती सिद्धी ।।

जो श्रीकृष्णाला भजतो, त्याच्या प्रेमात विरघळून जातो, त्याच्या अंतःकरणात कृष्णच साकार होतो. मग आपलं अंगण म्हणजेच मन, संकल्पसिद्धींनी भरून जातं. अर्जुन जसा कृष्णमय झाला, तसं आपण झालो की कृष्ण आपलाच होऊन राहतो.

आणि पसायदान... ही तर जागतिक पातळीवरील सर्वोत्कृष्ट प्रार्थना. जे खळांची व्यंकटी सांडो पासून भूतां परस्परे जडो मैत्र जीवांचे.

दुष्टांचा अंधार नष्ट होवो, संपूर्ण विश्व धर्माचरणात दंग होवो, प्राणिमात्रांमध्ये मैत्र जडो, अशी विश्वकल्याणाची मागणी करणारी प्रार्थना दुसरी नाही. म्हणूनच माऊलींनी निवृत्तीनाथांकडे मागितलं, ''हे विश्वचि माझे घर व्हावे.''

त्या आर्जवी मागणीने निवृत्तीनाथ गहिवरले. ते म्हणाले, ''ज्ञानदेवा, तुझा वाणी यज्ञ पाहून मी धन्य झालो. तुझ्यासारखा विश्वप्रेमाची मागणी करणारा शिष्य मिळाला हे माझे भाग्यच. तुझ्या नुसत्या स्मरणाने माणसाच्या हृदयात ज्ञानसूर्य उगवेल आणि काळोख नष्ट होईल. तू मागितलेला प्रसाद तुला अखंड प्राप्त होवो.''

आणि म्हणूनच माऊली लिहितात -

येथ म्हणे विश्वेश्वरावो । हा होईल दानपसावो ।
येणे वरे ज्ञानदेवो । सुखिया झाला ।।

ज्ञानेश्वरांविषयी कितीही वाचलं, लिहिलं तरी कमीच आहे. पण एक खरं ज्ञानेश्वरीच्या वाचनाने मन प्रसन्न होतं, आयुष्याला पवित्र आणि शाश्वत वळण लागतं. ही दाही दिशांत केवळ आनंदाचा प्रकाश पसरवणारी ग्रंथसंपदा आहे.

चला, आषाढी वारी येतेय पुण्यात... माऊलींच्या पालखीत मनाने का होईना, सामील होऊ या. तयारीला लागू या. ज्ञानेश्वर माऊली ज्ञानराज माऊली तुकाराम । जय जय राम कृष्ण हरी ।

# आठवणींची शुष्क फांदी...

ज्योतिर्मय साहित्य

लुसलुशीत हिरवळीवर एक कोरडी नि शुष्क फांदी

मावळतीच्या रंगात रंगते

तिच्या आठवणींची नांदी

कधीकाळी उन्हात उभे असतानाची त्याची प्रतिमा त्या सुंदर शा रूपात, मंद वाऱ्याची झुळूक यायची.अन् ती पाने त्याची सावली माहीत नाही कुठे कशी आज कुठल्याशा जाणीवेने रापलेली. तिच्या त्या सावल्या त्याचा तो आधार आज एकाकी वाटेवरचे एक फक्त प्रतिबिंब म्हणून उमटते आहे.

पण आठवणींचा तो सागर उसळतो तेंव्हा आदळणारी ती लाट किती तुषारात विखरते आणि त्याचे बारीक बारीक स्फटिकात रुपांतर होऊन वेगवेगळ्या वाटांनी पांगतात. आणि हिरव्यागार लुसलुशीत हिरवळीवर दिसते ते.. ते.. म्हणजे फक्त एक काटेरी झुडूप.



एकटे एकाकी, मुक भावनेत हरवलेले, आकाशातले ते विविध रंग झेलताना सारे कसे अनुभवलेले, त्या दूर क्षितिजावर अनेक कवडसे बनून आठवणीत विसावलेले. अन् आकाशी उडणाऱ्या त्या पाखरांचा तो थवा त्याची साक्ष होतो. असाच तेंव्हाचाही तो थवा..! तेंव्हा आलेली ती उन्हे काळोखाच्या गच्च अंधारात गर्दीत हरवली. पण तरीही एकाकी पणाच्या त्या आठवणीत झुरताना अगदी कोरडे ठाक आणि अगदी शुष्क असे. आज कमजोर झालेली मुळे आधाराचा एक हात देण्यास सक्षम नसतात तेंव्हां शेंड्याकडून मुळापर्यंत आलेला शुष्कपणा त्यातून कोरडा पडलेला तो बुंधा फांद्या अगदी काट्यातूनसुद्धा वाळतात.

मुळांच्या त्या क्षमतेला जबाबदार धरताना निसर्ग नियम म्हणावा की नियती नाव द्यावे. हेच समजत नाही.जमिनीत घट्ट पाय रोवून उभे राहिल्यावर काळाच्या बंधनात अडकलेली वेळ कालांतराने माती वाहून नेता नेता मुळे उघडी पडतात. मातीत कितीही ओलावा असला तरी ती असक्षम असतात. बाजूची हिरवळ जगण्याच्या त्या वेदनेला एक नवे बळ देते. एक सोबती असते.




सायंकाळच्या त्या सावलीत उद्याची एक नविन पहाट उगवण्यासाठीच जणू रात्र होते. त्या काळोख्या अंधारात उद्याच्या सोनेरी पहाटेचे एक स्वप्न पाहण्यासाठी प्रेरीत करते. दूर वाटेवर कुठेतरी हिरवळ कुठेतरी वाळलेला तो पठार नजरेत मावतो पर्यंत दिसतो.आणि वेळ काल चक्राच्या गतीने फिरते.

आणि ..आणि.. उजाडणारी ती सोनेरी पहाट त्या वाळलेल्या त्या मुळांच्या एका अंकुरातून आकार घेत इवल्याशा मिटलेल्या त्या पानांच्या उघड मिटीतून सूर्याची कोवळी किरणे अंगावर घेते. तेंव्हा सकारात्मकतेच्या कक्षा रुंदावत उघड्या पडलेल्या त्या मुळांच्या त्या अंकुरातून पुन्हा नव्याने जन्म घेते. आणि नेमक्या वेळी प्रश्न पडतो जीवनाचा हा प्रवास कुठपर्यंत किंवा कसा याच्या प्रतिक्षेत..!